प्राचीन व अर्वाचीन
मराठी कवी.

१९०८

स्वीकारल्याची तारीख १८ एप्रिल १९
रजिस्टर नंबर २/१००८ A

प्राचीन व अर्वाचीन मराठी कवि.

१. मराठी साहित्यपरिषदेच्या खटपटीनें यंदां मे महिन्यांत दोन दिवस मराठी ग्रंथकारांचें संमेलन पुणें शहरांत भरलें होतें. त्या वेळीं अनेक विषय ऊहापोहाला घेण्यांत आले. त्यांत ‘ हल्लींच्या काळांत पूर्वींप्रमाणें कवि निर्माण होणें शक्य नाहीं असें जें कित्येकांस वाटतें, त्यांत कितीसें तथ्य आहे? चांगले कवि निर्माण होण्यास कोणत्या अड-चणी आहेत? त्या कशा दूर करण्यांत येतील?’ असा एक विषय होता. रात्र थोडी, सोंगें फार व प्रत्येकाची बतावणी बरीच मोठी व भानग-डीची असल्यामुळें, या विषयाची चर्चा व छान जशी विस्तारानें, शांतपणानें, पोक्तपणानें व कळकळीनें व्हावयास पाहिजे होती, तशी झालेली दिसत नाहीं. ज्यांना या विषयावर बोलण्याचा अधिकार किंवा ज्यांचा या विषयाशीं जिव्हाळ्याचा संबंध, अशा व्यक्तींना आपले विचार विस्तृतपणानें ग्रंथकारांच्या मेळ्यापुढें मांडण्यास सांपडले नाहींत. ‘ चंद्र-शेखर’ कवींनीं भीडमुरवतीला भीक न घालतां स्वतंत्र बाण्यानें आपले विचार पद्यरूपानें धाडिले असतां, कालसंकोचाच्या सबबीवर त्यांना धुडकावण्यांत आलें. ‘जुन्या कवींच्या कित्येक भक्तांस’ या वेळीं आपल्या विचारांस साफ वावरण्यास सांपडलें नाहींत म्हणून, आपल्या लेखणीला शीण देऊन वर्तमानपत्राच्या रकान्यांत आधुनिक कवींवर शेलकीं शेलकीं दुर्गंधवाक्कुसुमें उधळण्याचा आटापेट करणें भाग पडलें. एकंदरींत, गाडी किंवा घोडा रिकामा नाहीं, म्हणून नवरानवरींस घरींच ठेवून, गांवांत लग्नाची वरात मिरवण्यासारखा हा प्रकार झाला, असेंच आम्हांस कांहीं अंशीं वाटतें. असो. ग्रंथकारांच्या संमेलनापुढें रा. लक्ष्मण-शास्त्री लेले यांनीं सामान्यतः काव्यविवेचनपर असा एक निबंध वाचला व त्यांत त्यांनीं अर्वाचीन व प्राचीन मराठी कवींसंबंधें कांहीं त्रोटक विचार नमूद केले आहेत. नंतर या विषयावर संमेलनांत जरासा खल होऊन कांहीं सभासदांच्या बुद्धींतून असा सिद्धांत निघाला कीं, ‘ हिंदुस्थानांत हल्लीं प्रासादिक कवि कसे ते बियालाही नाहींत. आहेत, ते सर्व टफ टफ

करणारेच आहेत. कवित्वाचें डबोलें पूर्वकालीन मराठी कवींनीं जें एकदां आपलेंसें केलें, त्याचें दर्शन अजून कांहीं आधुनिक कवींना झालें नाहीं व पुढें तरी होईल किंवा नाहीं, वानवाच आहे.' देवदैत्यांनीं समुद्रमंथनाला आरंभ केल्याबरोबर पहिल्या प्रथम जसें विश्वसंहारक हालाहल विष बाहेर निघालें, तसेंच ग्रंथकारसंमेलनानें केलेल्या अल्पकाव्यविषयक चर्चेतून हें उपरिनिर्दिष्ट सिद्धान्ताचें कालकूट बाहेर पडलें आहे. देवदानवांनीं हालाहलाच्या उत्पत्तीनंतरही नेटानें मंथन चालू ठेवल्यावर बरींच रत्नें हातीं येऊन अंतीं अमृतलाभ घडला, त्याप्रमाणेंच संमेलनानें व्यापक रीतीनें, प्रोक्त व चिरकाल चर्चा चालू ठेविली, तर उमेद, उल्हास व समाधान या रत्नांचा उद्भव होण्याचा संभव आहे. अशा प्रकारचा योग अजून जुळून आला नाहीं, हें ग्रंथकार व कवि यांचें मोठें हतभाग्य होय. असो. प्रस्तुत विषयाच्या मंथनाला आपणही थोडें-बहुत साहाय्य करावें, अशा हेतूनें हा लेख लिहीत आहों.

२. प्रथम मराठी कवींत, 'प्राचीन' व ' अर्वाचीन ' हा भेद कोणत्या तत्त्वावर झाला आहे याचा विचार करूं. इ. सनाच्या तेराव्या शतकांत होऊन गेलेल्या मुकुंदराजज्ञानराजांपासून तों तहत इ. सनाच्या अठराव्या शतकांतील महीपतिमोरोपंतांपर्यंतचे सर्व कवि ' प्राचीन मराठी कवि' या नांवानें मोडतात. आणि इ. सनाच्या १९ व्या शतकांत जे कवि झाले ते ' अर्वाचीन कवि ' या वर्गांत गणले जातात; म्हणजे मराठी पद्य वाङ्मयाच्या ७०० वर्षांच्या काळांतील, पहिल्या ६०० वर्षांतले कवि ' प्राचीन ' व शेवटच्या १०० वर्षांतील कवि ' अर्वाचीन ' असें कालगणनेनें विभ्रम भासणारें वर्गीकरण झालेलें अ[illegible] आतां प्रश्न असा उद्भवतो कीं, जी कविमालिका ६०० वर्षेंपर्यंत सार[illegible] चालत आली, ती पुढें एकदम कशी ढांसळली? शेवटच्या शंभर वर्षांत[illegible] कवि मागील कविवर्गांतून एकाएकीं कसे निसटून बाहेर पडले? मोरोपंत [illegible] ज्ञानदेव यांत ६०० वर्षांचें अंतर असतां, किंवा महीपति व मुक्तेश्व[illegible] यांत जवळ जवळ दोनशें वर्षांचें अंतर असतां, हे सर्व कवि एक[illegible] ' प्राचीन ' वर्गांत येतात आणि महिपतिमोरोपंतांनंतर ५० वर्षांनीं ज्यांचा उदय झाला ते मराठी कवि मात्र निराळे निवडले जाऊन

'अर्वाचीन' सदरांत दडपले जातात, हा चमत्कार कशानें घडून आला आहे? १९ व्या शतकांत इंग्रजांनीं जी राज्यक्रांति घडवून आणली तिचें हें फळ आहे. पण केवळ राज्यक्रांति होणें इतकेंच कारण वरील तऱ्हेचें कार्य घडवून आणण्यास पुरेसें नाहीं. इंग्रजांचें राज्य प्रस्थापित होण्यापूर्वीं ६०० वर्षांत अनेक राज्यक्रांत्या घडून आल्या होत्या, व राष्ट्रावर अनेक घनघोर प्रसंग गुदरले होते, तरी पण त्या प्रसंगांनीं व राज्यक्रांत्यांनीं आमच्या महाराष्ट्रकविपरंपरेंत क्रांति घडवून आणलेली ठळक रीतीनें दिसत नाहीं. ज्ञानराज हे, मुसलमानी वावटळ महाराष्ट्रांत लोटण्याच्या पूर्वींचे कवि; नामदेव हे, मुसलमानी वावटळीची नुसती झुळुक अनुभवणारे कवि; एकनाथ हे, ऐन मुसलमानी अंमलाच्या भरभराटींतील दौलतावादच्या कारभाऱ्यांचे–जनार्दनस्वामींचे–पट्टशिष्य; मुक्तेश्वर, वामन, तुकाराम, रामदास, हे, परकीयांच्या जुलुमानें त्रासलेल्या व हातपाय झाडूं लागणाऱ्या महाराष्ट्राच्या मुमुक्षुकाळांतील कवि; मोरोपंत, महीपति हे पुणेरी बादशाहीच्या वैभवकाळचे सरस्वतीभक्त; तेव्हां ६०० वर्षांत जरी इतक्या राज्यक्रांत्या व उलाढाल्या होत होत्या, तरी या दीर्घकाळांतील दरोबस्त कवि जे एकाच मालिकेंत येतात, त्याचें इंगित इतकेंच कीं, या राजकीय उलाढालींनीं लोकांचे बौद्धिक विषय, ज्ञान, मनोरचना व वाक्स्फूर्ति यांवर अपूर्व संस्कार असा कधींच घडला नाहीं. हिंदूंचें राज्य जाऊन मुसलमानी बादशाही झाली काय व मुसलमानी बादशाहीच्या ठिकऱ्या उडून हिंदूंचें राज्य झालें काय, त्या उलाढालींत कवींच्या स्फूर्तीला अगदीं नवीन वळण लावण्याचें सामर्थ्य कधींच नव्हतें. मुसलमानांचें वाङ्मय फारसें विस्तृत नसल्यामुळें, त्याचा महाराष्ट्रीयांकडून व्यवहारापलीकडे कधींही अभ्यास न झाल्यामुळें, व काव्यविषयांत संस्कृत आणि मराठी यांहून निराळी अशी दिशा त्यांत न सांपडल्यामुळें, या ६०० वर्षांत मराठी कवींना जी काव्यस्फूर्ति मिळाली आहे, ती पौराणिक संस्कृत कवि व त्या त्या काळापूर्वीं झालेले मराठी कवि यांच्या पासूनच संभवली होती. चंद्रगोलाचें जसें एकच अंग आपल्याला दिसतें व दुसरें अर्धे अंग आपल्याला अज्ञात आहे, त्याप्रमाणेंच या काळांतील महाराष्ट्रकवींना काव्यगोलाच्या एकाच बाजूनें नेहमीं

स्फूर्तिकिरण लाभले व दुसरी बाजू ठळक रीतीनें नजरेपुढें आणण्यास फारसें बलवत् कारण घडलें नाहीं. गव्हांचें बीं निरनिराळ्या मगदुराच्या जमिनींत पेरलें म्हणजे जसें निरनिराळ्या जोमाचें रोप व कसाचें धान्य तयार होतें, परंतु तें सर्व गव्हाचेंच असतें; तद्वत् एकाच प्रकारची स्फूर्ति मिळत गेल्यामुळें या ६०० वर्षांतील कवींची काव्यसंपत्ति एकाच जातीची आहे, मात्र निरनिराळ्या व्यक्तींच्या बुद्धीच्या तरतरीप्रमाणें, श्रमाप्रमाणें, टापटिपीप्रमाणें व जाज्वल कल्पनाशक्तीप्रमाणें या काव्यसंपत्तीचा विकास कमजास्त मानानें मनोवेधक झालेला आहे.

परंतु इंग्रजी साम्राज्याची सत्ता महाराष्ट्रांत रोंवल्याबरोबर येथें नवीनत्व वारें खेळूं लागलें व त्याचा संस्कार मनावर व्हावयास लागला. या काळांतील कवींच्या स्फूर्तीचा उद्गम अगदीं निराळ्या ठिकाणाहून झाल्यामुळें, पूर्वींची काव्यपरंपरा तुटली व एक प्रकारच्या नव्याच काव्यसृष्टीचा पाया घातला गेला. या अर्वाचीन कविवर्गांतही दोन पोटभेद करण्यांत येतात; एक अव्वल इंग्रजींतील म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या तीन* चरणांतील व दुसरा या काळानंतरच्या पिढ्यांतील. आतां 'प्राचीन' व 'अर्वाचीन' कवींमध्यें भेद कसा पडला तें पाहूं. इंग्रजी अंमलापूर्वीं संस्कृताचें अध्ययन शास्त्री, पंडित व पौराणिक ज्या पद्धतीनें करीत असत, त्या पद्धतींत पुराणेतर संस्कृत कवींचीं काव्यें, नाटकें, चंपू इत्यादिकांचा व्यासंग अगदींच तात्पुरता होऊन, एकंदर अध्ययनाचा भर, भागवत, भारत, विष्णुमार्कंडेयादि पुराणें व वेदांतविषयक ग्रंथ यांकडेच असे. त्यामुळें प्राचीन मराठी कवींचीं काव्यें म्हणजे या संस्कृत ग्रंथांच्या प्रतिकृति, प्रतिबिंबें किंवा टीकाच होत, यांत शंका नाहीं. त्यांनीं आपली सर्व प्रतिभा, प्रसाद, बुद्धि व उत्साह हीं या कामीं खर्च केलीं. प्राचीन मराठी कवींचीं काव्यें हीं पौराणिक ग्रंथांचीं भाषांतरें

* ही कालमर्यादा स्थूल मानानें केलेली आहे; कारण या पहिल्या पोटवर्गांतील कित्येक कवि अद्यापही हयात आहेत व त्यांची परंपरा साफ खुंटली आहे असेंही नाहीं. वस्तुतः हल्लींचें एकंदरींत धोरण, हे दोन्ही पोटवर्ग एक होण्याकडे आहे, व या मिलाफांतच भविष्यकालीन कवींचें सामर्थ्य बीजरूपानें आहे.

किंवा टीकाच आहेत असें ऐकल्याबरोबर, प्राचीन कवींना घट्ट मिठ्या मारून अर्वाचीन कवींच्या अंगावर काळीं अकाळीं पाय झाडणाऱ्या कित्येक व्यक्तींची तळव्याची आग मस्तकाला जाईल, हें आम्ही समजून आहों; परंतु त्यास आमचा इलाज नाहीं. भाषांतर, टीका किंवा रूपांतर म्हटलें म्हणजे त्यांत स्वतःचें असें कांहींच नसतें, अशी जर कोणाची कल्पना असेल, तर ती मात्र अगदीं निर्भेळ सत्य आहे, असें समजूं नये.* भाषांतरांत भाषांतरकर्त्याचें भाषाज्ञान, प्रसाद, कल्पनाप्रभाव, विवेचक शक्ति, रचनाचातुर्य, मार्मिकता व अर्थबोध हृदयंगम रीतीनें करण्याची हातोटी, हीं चांगलींच कसोटीस लागतात. शब्दाला शब्द, ओळीला ओळ ठेवून देऊन हमाली भाषांतर करणें ही गुलामगिरी आहे परंतु आमच्या प्राचीन कवींनीं जीं भाषांतरें केलीं आहेत त्यांत समयविशेषीं योग्य संकोच किंवा विस्तार करून आपलें स्वातंत्र्य, कल्पनाप्रसवसामर्थ्य व रसिकत्व हीं त्यांनीं निदर्शनास आणून दिलीं आहेत. महाराष्ट्र कवींनीं भारतभागवतादिकांचीं भाषांतरें करून, मूळ कर्त्यांची ज्योत जागती ठेविली आहे, व तीवरून मूळ काव्यांचा अर्थबोध होतो इतकेंच नाहीं, तर तिच्या योगानें मूळ कवींचें सामर्थ्य,तेज व कीर्ति हीं कायम झालीं आहेत. ते आपआपल्या भाषांतरांत मूळ कवींचें केवळ अनुकरण करितात असें नाहीं, तर काव्यगुणांमध्यें त्यांच्याशीं स्वतंत्र बाण्यानें टक्करही मारतात. परंतु सामग्र्यानें विचार केला तर प्राचीन

---

*डेन हॅम नामक आंग्ल कवीनें उत्तम भाषांतरकारांचें असें वर्णन केलें आहे:—

That servile path thou nobly dost decline,
Of tracing word by word. aud line by line.
Those are the laboured births of slavish brains,
Not effect of poetry, but pains;
Cheap vulgar arts, whose narrowness affords
No flight for thoughts, but poorly stick at words.
A new and nobler way dost thou pursue,
To make translations and translators too.
They but preserve the ashes; thou the flame,
True to his sense, but truer to his fame.

मराठी कवींचे ग्रंथ पौराणिक ठशाचे असून, संस्कृतांतील पुराणेतर वाङ्मयाशीं त्यांचें साम्य फार थोडें आहे. रघुनाथपंडितांचा नलदमयंतीविवाह, नागजोशांचा सीतास्वयंवर, सामराजांचा रुक्मिणीस्वयंवर, आनंदतनयादिकांच्या काव्यांतील चूर्णिका, मोरोपंतांच्या कुशलवाख्यानांतील कांहीं भाग वगैरे स्थळें, नैषधकाव्य, कादंबरी, रघुवंश इत्यादि काव्यांची अस्फुट ओळख पटवीत; परंतु एकंदरींत या मराठी प्राचीन कवींचें धोरण पौराणिक थाटाचें आहे व हें धोरण ज्ञानेश्वरांच्या काळापासून जवळ जवळ अखंड चालल्यामुळें, कवींची परंपरा सारखी चालून त्यांच्यांत परस्परांविषयीं एक प्रकारचा विशेष आदर, सहानुभूति, कल्पनासादृश्य व बंधुत्व आढळून येतें.

आतां इंग्रजी सत्ता महाराष्ट्रांत प्रस्थापित झाल्यावर प्रथम जें पंडितमंडळ कवि या नात्यानें उदयाला आलें, त्याचा ओढा पौराणिक ग्रंथांकडे नसून, तो पौराणिक कालानंतरच्या संस्कृत वाङ्मयाकडे वळला. पुराणेतर संस्कृत काव्यें, नाटकें, कादंबरीसारखीं गद्य काव्यें, चंपू; हीं पाश्चात्य पंडितांनाही मान्य झालेलीं असल्यामुळें, हे ग्रंथ सरकारी पाठशालांतून नवीन पद्धतीनें शिकविण्यांत येऊं लागल्यामुळें, इंग्रजी काव्यप्रदेशांत थोडथोडा प्रवेश व संचारही होऊन त्याचें संस्कृतांतील पुराणेतर वाङ्मयाशीं बरेंच साम्य आहे हें मनांत बिंबल्यामुळें, व अशा कृतींचा मराठी सारस्वतांत बहुतेक ठणठणाट आहे असें पाहून हळहळल्यामुळें, या संस्कृत वाङ्मयाचें सार मराठींत आणून सोडण्याची अव्वल इंग्रजींतील पंडित कवींना प्रबळ इच्छा होऊन त्यांनीं त्या कामीं कंबर बांधून आटोकाट मेहनत घेतली. या कवींना आंग्ल भाषेचाही थोडा फार परिचय लाभून तिच्या खऱ्या वैभवाची साक्ष पटलेली होती. परंतु जरी आंग्ल भाषेंतील सुरस गद्य ग्रंथांचीं भाषांतरें व रूपांतरें त्यांनीं मराठींत उतरलीं, तरी तो प्रयोग त्यांनीं आंग्ल भाषेंतील पद्यग्रंथांवर फारसा* केलेला नाहीं. याचें कारण बहुधा हेंच असावें, कीं, आंग्ल

* या कालांत आंग्ल काव्यांच्या आधारें रचलेले असे दोनच पद्य ग्रंथ आमचे पाहण्यांत आहेत. एक, डॉ. कीर्तिकरांची 'इंदिरा' व दुसरा, रा. सा. महाजनींचा 'कुसुमांजलि.' या दोहोंपैकीं गुणांच्या मानानें पाहतां 'कुसुमांजली'चा

भाषेंतील पद्यग्रंथांचीं रूपांतरें मराठींत प्रविष्ट केलीं असतां मराठी पद्य वाङ्मयाचें एक प्रकारचें विशिष्टत्व नष्ट होईल, कविपरंपरा विसकळेल, व लोकही विदेशीय अनुकरणानें एकदम बिचकतील, असें धोरण त्यांनीं बांधलें असावें. शिवाय, लोकांना फारसें अपरिचित न वाटणारें असें पुराणेतर उज्ज्वल संस्कृत सारस्वत अपरंपार असतांना, एकदम आंग्ल सारस्वताकडे धांव ठोकण्याचें कारण नाहीं, असाही त्यांनीं विचार केला असावा. याचा परिणाम असा झाला कीं, पुराणेतर संस्कृत काव्यें मराठींत उतरून, मराठी काव्यवाङ्मयाची पूर्वींची दिशा तर बदललीच, परंतु आंग्ल तेज मराठी काव्यांत भरण्याचें काम मात्र पुढील कवींकरितांच जणूं काय राखून ठेवण्यांत आलें. अशा रीतीनें आंखलेल्या मार्गानें या पंडितकवींनीं सतत श्रम करून फारच मोठी व उत्तम कामगिरी उठविली व सरकारी विद्याखात्याचीं सूत्रें थोडींबहुत त्यांच्याच तंत्रानें चाळलीं जात असल्यामुळें त्यांची कामगिरी साक्षर वर्गापुढें ठळक रीतानें येण्याचा मार्गही सरळ, सोपा व उघडा होता. रा. राजवाडे, चिपळूणकर, लेले, गोडबोले, पारखी, इत्यादि पंडित कवींनीं या कालीं सरस्वतीची सेवा करून, शाकुंतल, मालतीमाधव, विक्रमोर्वशी, मुद्राराक्षस, मृच्छकटिक, नागानंद, प्रियदर्शिका, रत्नावली, प्रसन्नराघव, उत्तररामचरित, वेणीसंहार, वगैरे दरोबस्त मुख्य मुख्य विद्वन्मान्य नाटकांचीं प्रतिबिंबें महाराष्ट्र वर्णांनीं रंगविलीं. तसेंच, त्यांच्या परिश्रमानें रघुवंश, ऋतुसंहार, भामिनीविलास, हरिविलास, मेघदूत, अमरुशतक, महिम्नस्तोत्र, *व्यवसायदीपन, गंगालहरी, वगैरे संस्कृत काव्यांच्या प्रतिकृति मराठीला सजविल्या झाल्या. याच कालांत भट्टवंशकाव्य, स्ववंशकाव्य, कृष्णाकुमारी, शोकावर्त, अकबरकाव्य, विलापलहरी, गंगावर्णन, यशवंतराव-

जितका कमी आदर झालेला आहे, तितकाच 'इंदिरे'चा फाजील वडेजाव झालेला दिसतो. रा. बजाबा रामचंद्र प्रधान या कवींनीं स्कॉट् कवीच्या ' Lady of the Lake ' या काव्याच्या आधारें ' देवसेनी ' नांवाचें काव्य रचिलें आहे, त्यांतील कांहीं उतारे पाहण्यांत आले आहेत, त्यावरून तें काव्य सरळ व सरस दिसतें.

* हें काव्य किरातार्जुन काव्याच्या पहिल्या सर्गाचें, रा. गणेशशास्त्री लेले, यांनीं केलेलें भाषांतर आहे.

महाकाव्य, राजा शिवाजी, शिवाजीचरित्र, वगैरे बरींच स्वतंत्र काव्येंही रचलीं गेलीं; पण या काव्यांना जी स्फूर्ति मिळाली, ती संस्कृत पुराणेतर काव्यांकडूनच मिळाली आहे, असा अंदाज होतो. तिच्यांत पौराणिक सारस्वताचा किंवा आंग्ल काव्यांचा संस्कार क्वचित्च आढळतो.

यानंतरचा काल म्हणजे अलीकडील पंचवीस वर्षांचा होय. हा आंग्ल कवित्व व संस्कृत कवित्व यांच्या मनोहर मिश्रणाचा आहे. ज्याप्रमाणें रसायनांत दोन भिन्न पदार्थांचा संयोग होऊन त्या दोन्ही घटकांपासून गुणांनीं भिन्न असा तिसराच स्वतंत्र पदार्थ बनतो, त्याप्रमाणेंच पाश्चात्य व प्राच्य तत्त्वांनीं घटित झालेल्या अलीकडील महाराष्ट्रकाव्यरसायनाची स्थिति झाली आहे. मनुष्यस्वभावाचें हुबेहुब वर्णन, निरनिराळ्या मनोवृत्तींचा प्रभाव, निसर्गांतील अनंत चमत्कार व त्यांतील गूढ रहस्य, अगदीं परिचयांतील साध्या गोष्टी व त्यांवरून सुचणारे ईश्वरी शक्तीचे, नीतिनियमांचे व मानवी कर्तव्याचे विचार, कल्पनेच्या पंखांवर सूक्ष्म वातावरणांत विहार किंवा सर्वांस व्यक्तिशः अनुभवास येईल असा पृथ्वीतलावरील व्यवहार, इत्यादि विषय या कालांतील मराठी कवींचे आहेत. यांतील बऱ्याच कवींना आंग्ल वाङ्मयाची चांगली ओळख होऊन, त्यांना झालेली काव्यप्रेरणा बर्न्स्, लॉंगफेलो, शेले, कूपर, वर्डस्वर्थ, टेनिसन, इत्यादि निसर्गभक्त आंग्ल कवींच्या काव्यांनीं केलेली आहे. सृष्टि हें या कवींच्या कृतीचें जीवन आहे. अखिल ब्रह्मांड ज्या दैवी शक्तीनें अस्तित्वांत आलें, त्या दैवी शक्तीची कल्पना होण्याचा मार्ग म्हणजे सृष्टिच होय, अशी या वर्गांतील कवींची पूर्ण *भावना आहे. सृष्टिवर्णन म्हणजे या कवींची एक सगुणोपास्तिच होय. पदार्थमात्रांत ईश्वरी सामर्थ्याची व चातुर्याची ओळख पटवून घेणें, हेंच या काव्याचें मर्म आहे. ज्याप्रमाणें विठोबा-

---

*But is it not reckoned still a merit, proof of what we call 'Poetic Nature,' that we recognise how every object has a divine beauty in it; how every object still verily is a window through which we may look into Infinitude itself?
—Thomas Carlyle.

सारख्या उपास्य देवतेची भक्ति हें तुकारामादि संत कर्त्रींच्या काव्याचें जीवन दिसून येतें, त्याप्रमाणेंच सृष्टीची भक्ति हें या आधुनिक कवींच्या काव्यांचें मर्म आहे. त्यामुळें तुकारामादिकांच्या अभंगांप्रमाणेंच या आधुनिक कविवर्गाची कृति फुटकळच आढळून येते. आधुनिक कवींनीं कोणताही एक विषय घेऊन त्यावरच सलग अशी मोठी रचना न करितां, निरनिराळ्या मनोवृत्ति, प्रासंगिक विषय, सृष्टिनिरीक्षण व नैसर्गिक नीतितत्त्वें यांस अनुसरून लहान लहान चुटकेच रचलेले बहुशः आढळतात. तुकारामाचे जसे एकमेकांपासून विलग असणारे अभंग किंवा वर निर्दिष्ट केलेल्या आंग्ल कवींचे जसे 'सॉनेट्स्' 'ओडस्', वगैरे नांवांनीं सुप्रसिद्ध झालेले स्फुट काव्यप्रकार असतात, तसेच आधुनिक कवींचे हे सृष्टिभक्तिपूर्ण चुटके होत. अशा प्रकारचे शेंकडों चुटके मासिक मनोरंजन, काव्यरत्नावलि, करमणूक व विविधज्ञानविस्तार या मासिकांतून प्रकाशांत आलेले आहेत.

या विवेचनावरून असें मात्र कोणीं समजूं नये कीं, याहून निराळ्या थाटाच्या काव्यरचना हल्लीं मुळींच होत नाहींत. परंतु वरील तऱ्हेच्या सृष्टिभक्तांचा भरणा आजकालच्या कविवर्गांत प्रामुख्यानें दिसतो व त्याचें धोरण 'अव्वल इंग्रजींतील महाराष्ट्र कवि' व 'प्राचीन महाराष्ट्र कवि' या दोहोंहूनही भिन्न असल्यामुळें, त्याचा विशेष ऊहापोह केलेला आहे. बाकी, आजकाल सुद्धां पौराणिक विषयावर रचना करणारे, पुराणेतर संस्कृत काव्यांच्या प्रतिकृति वठविणारे, विनोदात्मक किंवा अन्योक्तिपूर्ण कवित्वग्रंथ लिहिणारे, ऐतिहासिक विषयांकडे सरस्वतीचा मोर्चा फिरविणारे, केवळ व्यावहारिक गोष्टींचें पद्यरूपानें विवरण करणारे, वगैरे अनेक पद्धतीचे कवि दृष्टीस पडतात. परंतु त्या सर्वांचा समावेश पूर्वींच्या दोन वर्गांपैकीं कोणत्या तरी एका वर्गांत विषयानुरोधानें व रचनापद्धतीनें करितां येण्यासारखा असल्यामुळें, त्यांची विशेष चर्चा करण्याचें प्रयोजन भासत नाहीं.

३. अर्वाचीन मराठी कवि व प्राचीन मराठी कवि यांच्या काव्यस्फूर्तींत, प्रतिभोद्रेकांत व विषयस्वरूपांत काय निराळेपणा आहे, याचें विवेचन वरील कलमांत झालें. आतां या दोन वर्गांतील कवींच्या

काव्यांच्या बाह्यांगांचा–भाषापद्धति, छंदोरचना, इत्यादिकांचा–तारतम्यानें विचार करूं. प्राचीन मराठी कवींची भाषापद्धति बरीच शिथिल आहे असें दिसतें; पण त्या काळाचा विचार केला म्हणजे तें अगदीं साहजिकच होतें. एक तर, कालानुक्रमानें भाषेंत फरक पडल्यामुळें, आज मितीस जीं शब्दांचीं रूपें व ज्या वाक्यरचना आपणांस व्याकरणनियमाविरुद्ध किंवा अपरिचित वाटतात, तीं रूपें व त्या रचना त्या त्या काळीं रूढ असल्यामुळें, वस्तुतः शिथिल नसून, केवळ आपल्या नवीन दृष्टीला शिथिल दिसतात. तेव्हां या शिथिलत्वाबद्दल प्राचीन कवींना निरंकुशत्वाचा दोष लाविणें कधींही योग्य होणार नाहीं. शिवाय, त्या काळीं हल्लींप्रमाणें जिकडे तिकडे साक्षर वर्गांत मराठी व्याकरण ग्रंथ प्रसिद्ध किंवा मान्य झालेले नसल्यामुळें, सद्यःकालीन मराठीप्रमाणें त्या काळच्या मराठीला साधारणतः ठरींव रूप आलेलें नव्हतें. त्यामुळें बऱ्याच कवींना प्रांतिक भाषापद्धति व कित्येक वेळां तर विशिष्ट जातींतील भाषापद्धतिही आपल्या ग्रंथांत आदरणें अवश्य झालें होतें. त्याप्रमाणेंच ज्या कवींचा त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या ज्या संस्कृत किंवा मराठी कवींच्या ग्रंथांशीं जसा व्यासंग असे, तसा त्या पूर्वकवींच्या रचनापद्धतीचा, त्यांच्या रचनेवर कमीजास्ती संस्कार घडणें अगदीं स्वाभाविकच होतें. म्हणून एकाच काळीं झालेल्या 'प्राचीन मराठी कवीं'च्या भाषापद्धतींत विलक्षण फरक दिसून येतो. तुकाराम, रामदास, विठ्ठल, यथार्थदीपिकाकार वामनपंडित, यमक्या वामन, मुक्तेश्वर, इत्यादि समकालीन कवींच्या भाषेंतही शब्दांचीं रूपें, वाक्यरचना, व ह्रस्वदीर्घादिसंबंधीं लेखनपद्धति यांत ठळक भेद दृग्गोचर होतात. हल्लींच्या काळची स्थिति अगदीं निराळी आहे. मराठी भाषेचे प्रांतिक भेद कितीही व कसेही असोत, लेखनांतील भाषेची ठेवण आतां आंखल्यासारखीच झाली आहे. त्यामुळें कोणी एकाद्यानें आपल्या भाषेंत निरर्गलता किंवा प्रांतिक विशिष्टत्व प्रकट केल्यास तो ठरींव व्याकरणनियमांचा भंग केल्याच्या आरोपास व टीकेस पात्र होतो. जें शिथिलत्व प्राचीन कवींत क्षम्य होतें, इतकेंच नव्हे, तर कित्येकांच्या मतांप्रमाणें ज्या शिथिलत्वांतच सर्व प्रसाद सांठविलेला आहे, तें

शिथिलत्व, आजकालच्या कवींनीं आपल्या काव्यांत शिरूं दिल्यास, हास्यास्पद व अक्षम्य होईल, हें उघड आहे. कालस्थितींत फरक झाल्यामुळें अशा तऱ्हेचा भाषेच्या बाह्यांगासंबंधींचा नाजुकपणा व टापटीप हीं आजकाल टीकाकार व कवि या दोन्ही वर्गांच्या मनांत पूर्णपणें ठसलीं आहेत. तेव्हां प्राचीन मराठी कवींची वाणी अपरिचित किंवा शिथिल भासली म्हणून जशीं तिला नाकें मुरडावयास नकोत, तशींच अर्वाचीन कवींची वाणी नियमबद्ध व ठाकठिकीची असते म्हणून तिलाही कृत्रिमतेचीं दूषणें लावावयास नकोत. पूर्वीप्रमाणें हल्लींही प्रसादगुण कांहीं कवींच्या वांट्यास आलेला आहे. हल्लीं कवींचा जिकडे तिकडे सुळसुळाट झालेला दिसत आहे खरा, परंतु यांपैकीं प्रसादगुणानें व अस्सल कवित्वगुणानें ज्यांचीं काव्यें रसरसलेलीं आहेत, तींच चिरकाल लोकांच्या आठवणींत राहतील व बाकीचीं विस्मरणाच्या अगाध अंधकूपांत गडप होऊन नष्टप्राय होतील. कवींचा सुळसुळाट हा अलीकडेच झाला आहे, असें नाहीं. हें पीक महाराष्ट्रांत पूर्वीपासूनच पुष्कळ मुबलक पिकत आलेलें आहे. परंतु त्यावर वरील नियमाचा अंमल होऊन, त्या अपरंपार पिकापैकीं १०–१५ कवींचे कणच काय ते गेल्या सातआठशें वर्षांची वानगी म्हणून लोकांच्या हातीं ठरून, त्यांनीं लोकांचीं मानसिक क्षुधा शांत केली आहे. अलीकडे कित्येक खटपटी शोधकांनीं हीं गडप झालेलीं काव्यांच्या पिकाचीं जुनीं पेवें खणून काढण्याचा मोठा प्रयत्न चालविला आहे. परंतु आजपर्यंत उपसलेल्या कुसक्या निःसत्व पेवांमध्यें दोनचारच लहान लहान कण ससत्व व गोड आढळले आहेत; तरी पण या शोधकांच्या प्रयत्नाला एवढें तरी–डोंगर पोंखरून उंदीर काढण्याचें तरी–यश आलें, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. परंतु असे तेजस्वी मधुर कण पूर्वींच्या लोकांनीं अंधाराच्या कोठारांत कसे खितपत पडून दिले, याचें जरासें नवलच वाटतें. अथवा नवल वाटण्याचेंही कारण नाहीं. विद्येचा प्रसार, रसिकतेचें उद्बोधन करणारे संस्कार व मुद्रणकलेसारखें ग्रंथ तत्काळ अनेक लोकांच्या नजरेस पाडण्याचें साधन, हीं जोंपर्यंत राष्ट्रांत चांगलीं खेळूं लागलीं नाहींत, तोंपर्यंत सामान्य किंवा क्षुद्र ग्रंथांबरोबर श्रेष्ठ दरजाचे ग्रंथही आठवणींतून जाण्याचा पुष्कळ संभव असतो; सुक्याबरोबर ओलें

जळण्यासारखाच हा प्रकार आहे. इंग्लंडमधील काव्यदेवीचे परमभक्त जे जगद्विख्यात मिल्टन् व शेक्सपिअर, यांच्या ग्रंथांची अशाच प्रकारें बरींच वर्षे निष्काळजीपणानें *अवहेलना झाली होती; परंतु पुढें वर निर्दिष्ट केलेल्या तीन गोष्टींचा राष्ट्रांत उदय झाल्यावर या कवींची कृति अंधारांतून निघून एकदा ठळक रीतीनें लोकांच्या नजरेसमोर आल्यापासून त्यांच्या भक्तांची संख्या सारखी वाढत आहे, व जेथें आंग्ल भाषेचें नांव ऐकू येतें, तेथें त्यांची कीर्ति दशदिगंत भरून राहिली आहे. असो. एकंदरींत सांगावयाचें म्हणून एवढेंच कीं, हल्लीं जसा कवींचा सुळसुळाट झालेला आहे, तसाच तो पूर्वींही होता. हल्लीं जसे सरसनीरस कवि आहेत, तसे पूर्वींही होते. परंतु जुन्यांचा उद्धार करणाऱ्या काव्य-संग्रह, महाराष्ट्र कवि, प्रभात वगैरे मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध होणाऱ्या बऱ्याच भांवरभुंज्या किरकोळ कवींवरून पूर्वींचे सर्व कवि प्रसादहीन व कवित्वहीन होते, असें सरसहा विधान करणें जितकें हास्यास्पद, भ्रामक व बुद्धिमांद्यदर्शक होईल, तितकेंच हल्लींच्या कांहीं कवींच्या नीरस पद्यांचे उतारे देऊन सद्यःकालीन सर्व कविवर्गावर वज्र घेऊन उसळणाऱ्या अर्वाचीन टीकाकारांचें करणेंही उपहासपात्र व मांद्यव्यंजक ठरेल, हें निःपक्षपात दृष्टीला सहज मान्य होईल. 'पुणें गांव आहे, नदीकांठ आहे, मढीं जाळती लोक तें पात्र वाहे.' किंवा 'गंगूस वारा चवदाचि रंगू' अशा प्रकारचे शिळपटलेले दाखले दाखल करून दरोबस्त अर्वा-

* जॉन्सन् या आंग्ल पंडितानें या अवहेलनेची अशी मीमांसा केली आहेः— The call for books was not in Milton's age what it is at present. To read was not then a general amusement; neither traders, nor often gentlemen, thought themselves disgraced by ignorance. The women had not then aspired to literature, nor was every house supplied with a closet of knowledge. Those, indeed, who professed learning were not less learned than at any other time; but of that middle race of students who read for pleasure or accomplishment and who buy the numerous products of modern typography, the number was then comparatively small. —Lives of Poets.

चीन कवींना प्रसादहीनत्वाच्या परिष्कारांत आणण्याचा कोटिक्रम केवळ लंगडालुला आहे, हें रा. आजगांवकरांसारख्या टीकाकार लेखकांनीं लक्षांत ठेविलें असतां, त्यांत त्यांचें व आधुनिक कवींचें असें दोघांचेंही हित आहे.

प्रसादगुण म्हणजे काय याविषयीं या ठिकाणीं जरा विस्तृत ऊहापोह केला, तर तो अस्थानीं होईल असें वाटत नाहीं. प्रसादाची *व्याख्या साधारणतः 'शब्दसौकर्य' किंवा 'वाचतां क्षणींच अर्थबोध होण्याचा जो गुण तो' अशी करण्यांत येते. लांकडें सुकीं असलीं म्हणजे ज्याप्रमाणें अग्नि तत्काळ पेटून त्याचा प्रकाश जिकडे तिकडे लखलकन पसरतो व निर्मळ जळ ज्याप्रमाणें भोंवतालच्या पदार्थांचें स्पष्ट प्रतिबिंब दाखवितें, त्याप्रमाणें ज्या रचनेनें अर्थबोध तत्क्षणीं होऊन तो वाचकांच्या किंवा श्रोत्यांच्या अंतःकरणाला व्यापून टाकतो व वर्णनविषयभूत कल्पनेचें किंवा पदार्थांचें प्रतिबिंब त्यांच्या हृत्पटलावर तत्काळ वठतें, ती रचना प्रसादगुणविशिष्ट आहे, असें समजावें. परंतु प्रसादगुण व साधे शब्द यांचें सातत्यानें साहचर्य असलेंच पाहिजे, असें मात्र म्हणणें सयुक्तिक नाहीं. अर्थबोध करण्याची आपली जी साध्या व्यवहारांतील शब्दयोजना असते, ती काव्यांत सरसहा शोभेल असें मुळींच नाहीं. जसा विषय भारदस्त असेल, जसा वाचकवर्ग श्रेष्ठ, सुसंस्कृत दरजाचा असेल, जशी कल्पनांची धांव प्रौढ व उच्च असेल, तसतशी भाषापद्धतीही सुबोध असून प्रौढ, गंभीर व गहन अशी असावी लागते. ती अगदींच घरगुती असली तर भारदस्त कल्पनाही हीन भासूं लागते व हीन कल्पनाही प्रौढ भाषेनें थोड्याबहुत आदरास पात्र होते, असा प्रत्यक्ष अनुभव आहे. समाजांत उच्चनीच वर्ग असतात व तदनुसार

---

* शुष्केंधनाग्निवत्स्वच्छजलवत्सहसैव यः।
व्याप्नोत्यन्यत्प्रसादोऽसौ सर्वत्र विहिता स्थितिः ॥

—मम्मटाचार्यकृत काव्यप्रकाश.

शीघ्रार्थबोधकत्वं तु प्रसाद इति कथ्यते ॥
प्रसादः पदसौकर्यादक्लिष्टत्वान्न भिद्यते ॥

—श्रीकृष्णकविकृत मंदारमरंदचंपू.

यावदर्थकपदत्वमर्थवैमल्यं प्रसादः ॥ वाक्यार्थं करबदरमिव निवेदयंती घटना प्रसादस्य ॥

—जगन्नाथकृत रसगंगाधर.

त्यांचे आचारविचार, पेशेपेहराव, बोलीचाली, हींही ठरलेलीं असतात. पण जर त्यांची उलटापालट केली, तर ज्याप्रमाणें एकाद्या थोर मनुष्याचेही प्रौढ गुण, श्रेष्ठत्व व सत्कृति, हीं केवळ त्याच्या विपरीत बाह्य देखाव्यानेंच आपल्या नजरेंत ठळक रीतीनें न भरल्यामुळें, त्याच्याविषयीं असद्ग्रह उत्पन्न होण्याचा अतिशय संभव आहे, त्याप्रमाणेंच विसदृश भाषावेषानें काव्यविषयांचा अनिष्ट प्रकार होण्याची भीति असते. तेव्हां विषयाला साजेशी भाषा असून योग्य दरजाच्या वाचकवर्गास तिचा अर्थबोध अविलंबानें प्रतीत झाला, म्हणजे ती भाषापद्धति प्रसादयुक्त आहे, असें समजणें हेंच रास्त होय. म्हणून कोणत्याही कवितेंत जरासे संस्कृत *शब्द किंवा समासघटित रचना पाहिल्याबरोबर 'एषां प्रसादहानिः' हें सूत्र पुटपुटत राहण्यांत फारसा मतलब नाहीं. मोरोपंतांच्या कवितेचा ज्यांस चांगला परिचय आहे, ते त्यांच्या कवितेला प्रासादिक म्हणतात, त्यांतील मर्म हेंच आहे. आज ज्ञानेश्वरी वाचल्याबरोबर तिचा अर्थ लागलाच मनांत उतरतो अशी स्थिति नाहीं, म्हणून ज्ञानेश्वरीला प्रसादहीन कोण म्हणेल? ' मल्लिनाथकविः सोऽयं मंदात्मानुजिघृक्षया । व्याचष्टे कालिदासीयं काव्यत्रयमनाकुलम् ।' या श्लोकावरून कालिदासाचीं तीन काव्यें प्रसादगुणहीन आहेत, असें कोणी प्रतिपादन करूं लागला, तर रसिकमंडळांत त्याला कोण थारा करील? यावरून हें समजावयाचें

* मिल्टन् हा आंग्ल कवि अत्यंत प्रासादिक आहे व त्याचें 'पॅरॅडाइस लॉस्ट ' हें अद्भुतवीररसप्रधान काव्य आंग्ल वाङ्मयभांडारांतील एक अपूर्व तेजस्वी रत्न आहे. पण या कवीची भाषा लॅटिन, ग्रीक, वगैरे भाषांनीं मिश्रित व सामान्य जनांस समजण्यास कठीण व गहन अशी आहे. त्या संबंधानें जॉनसन्नें असें लिहिलें आहे:—" Of him, at last, may be said what Jonson says of Spenser, that *he wrote no language*, but has formed what Butler calls a Babylonish Dialect, in itself harsh and barbarous, but made by exalted genius and extensive learning the vehicle of so much instruction and so much pleasure, that, like other lovers, wet find grace in its deformity." हा उतारा वाचतां क्षणींच, 'प्राकृतसंस्कृतमिश्रित यास्तव कोणी म्हणेल ही कथा ।' या मोरोपंताच्या उक्तीची आठवण झाल्यावांचून राहात नाहीं.

कीं, रचनेंतील लठ्ठ किंवा रोडके शब्द पाहून, त्यावरून ती रचना कृत्रिम किंवा प्रसन्न ठरविणें, हें विवेकमार्गाला धरून होणार नाहीं. हें प्रौढ, ओजस्वी, व समासघटित रचनाविशेषासंबंधानें झालें. आतां कित्येक आधुनिक कवींची रचना साधी, सोपी व अत्यंत परिचयाची असूनही, ती सामान्य वाचकांस आकलन करण्यास व अर्थमर्म जाणण्यास कठिण जाते, असें कित्येक वेळां आढळतें. याचें कारण असें आहे कीं, विदेशीय स्फूर्तीनें अलीकडे ज्या कल्पना व विचारांच्या तऱ्हा स्फुट काव्यांतून येऊं लागल्या आहेत, त्या वाचकांस अगदीं अपरिचित असल्यामुळें विक्षिप्त वाटून तत्काळ पटत नाहींत. वाचकांची वृत्ति कविकल्पनेशीं तादात्म्य पावत नसल्यामुळें त्यांचा जोड जमत नाहीं व अर्थप्रतीति घडत नाहीं. तांबड्या किंवा पांढऱ्या वस्त्रावर नवा तांबडा रंग तत्काळ चढतो, परंतु तो काळ्या किंवा इतर रंगाच्या वस्त्रावर जसा प्रयत्नावांचून चढत नाहीं, त्याप्रमाणें नवीन पद्धतीचे आधुनिक कवि व त्यांचे वाचक यांची थोडीबहुत स्थिति झाली आहे. कालांतरानें ही स्थिति पालटून आधुनिक काव्यांतील प्रसाद वाचकवर्गास पटूं लागेल, अशी आम्हांस तरी उमेद आहे.

कित्येक टीकाकारांची अशी समजूत आहे कीं, प्रासादिक काव्य म्हटलें म्हणजे तें खंड न पडतां, एकसारखें झऱ्याप्रमाणें कवीच्या मुखांतून वाहत राहिलें पाहिजे, व अशा प्रकारें जे बोल बाहेर पडतात तेच उत्तम कवित्वमय असतात व त्यांना सफाईचा किंवा सुधराईचा हात देण्याची जरूर पडत नाहीं. त्यांच्या दृष्टीनें दीर्घ मनन करून, किंवा कल्पनांची व शब्दांची आवडनिवड करून, किंवा एकदां लिहिल्या गेलेल्या मजकुरांत संक्षेपविस्तार करून, किंवा दुसऱ्यानें दिलेल्या विषयाचा अंगीकार करून, जें काव्य निर्माण होतें, तें काव्य सहज-मनोहर किंवा स्वभावसुंदर असूंच शकणार नाहीं. परंतु हें मत सर्वस्वीं ग्राह्य आहे असें वाटत नाहीं. चित्र रंगविणाऱ्या चिताऱ्याजवळ सर्व तऱ्हेचे रंग असतात, त्या सर्वांचा सारखा उपयोग चित्र रंगविण्याचे कामीं करावयाचा नसतो; तर त्यांतून निवड करून योग्य तेवढेच रंग प्रसंगानुरोधानें उपयोगांत आणावयाचे असतात. तो जर म्हणेल कीं, जो रंग साहजिक माझ्या हाताला येईल, त्याचाच मी उपयोग करीन,

तर त्याचें चित्र कितीसें उत्तम वठेल? एकादे वेळीं एकादा रंग चितारी सद्य:स्फूर्तीनें चित्राला लावतो, परंतु पुढें संथपणें विचार केला असतां किंवा कोणीं सूचना केली असतां त्याला तो रंग अयोग्य स्थानीं पडला आहे असें स्पष्ट दिसूं लागतें. मग शक्य असल्यास, त्यानें तो रंग काढून त्या ठिकाणीं उचित रंगाची छटा उमटविणें अगदीं रास्त नाहीं का? कवीचीही स्थिति अशीच आहे. त्याला प्रथम विषयाचें मनन करावें लागतें व त्याचा आराखडा ठरवावा लागतो. या गोष्टीचा निश्चय होण्यालाच बहुधा बराच काळ लागतो. अनेक वेळां 'हें नाहीं तें बरें' असें करीत करीत विषयाचें स्वरूप बदलत जातें. एकदां आराखडा निर्णीत झाला, म्हणजे प्रत्यक्ष काव्यरचनेचें काम सुरु होतें. यांत कवीला सारासारविचार, मार्मिकता, प्रसंगानुसार कोमलता, परुषता वगैरे गुण, सूक्ष्म निरीक्षण, डौलदारपणा, छंदोबंध, इत्यादि काव्याला अवश्य अशा सर्व गोष्टींची सांगड प्रसादाशीं घालावयाची असते. ती कित्येक वेळां चटकन बसते, तर कित्येक वेळां मुळींच जुळत नाहीं. एकादे वेळीं ही सांगड योग्य रीतीनें सजली आहे असें भासतें, पण नंतर स्वतःच्याच बुद्धीला ती विपरीत दिसूं लागते. म्हणून आपलें काव्य वारंवार वाचून, त्यांत योग्य दिसेल तो फेरफार करणें अत्यंत अवश्य आहे. कवि चांगला कसबी असेल, तर अशा सुधराईच्या प्रयत्नानें तो आपल्या काव्यांतील नीरस स्थळें सरस करील, बेडौल स्थळें मनोवेधक करील व प्रसादाची ज्योत अधिक उजळ करील. आपल्याकडील मोरोपंत कवि अशाप्रकारें आपल्या काव्यांना वारंवार झिलई देत असत, असें सांगतात. त्यांच्या महाभारतांत मधून मधून एकाच अर्थाच्या व बहुतेक त्याच शब्दांच्या अशा लागोपाठ दोन दोन आर्या कांहीं थोड्याशा रचनाभेदानें आलेल्या *आढळतात. त्यावरून तरी

---

* पुढील कर्णपर्वांतील दोन लागोपाठ आलेल्या आर्या पहा:—

जलदांधकार हरिला, पार्थे योजूनि पावना सारा।
भक्तें मोह जसा हरिनामा योजूनि पावना सारा. ॥ २५ ॥
वरुणास्त्रतिमिर पार्थे हरिलें तत्काळ पावनें सारें,।
भक्तें अज्ञान जसें हरिनामें विश्वपावनें सारें. ॥ २६ ॥

—मोरोपंती कर्णपर्व, अ० ४९.

वरीलच अनुमान ओघानेंच फलित होतें. पंत आपले ग्रंथ निरनिराळे पुराणिक, हरिदास, पंडित व रसिक वाचक यांस दाखवून त्यांच्या सूचना मोठ्या आनंदानें स्वीकारीत असत. क्षणिक स्फूर्तीनें काव्य नुसतें निर्माण होईल, परंतु अशा प्रकारच्या प्रयत्नानें तें उत्तम रंगारूपास चढेल. जशीं जन्मास आलेल्या अर्भकास मातृस्तन्य, अन्न पाणी, वडील माणसांनीं घेतलेली काळजी आणि समाजस्थिति, हीं पोषक होतात, तद्वतच स्फूर्तीच्या गर्भांतून बाहेर पडलेल्या काव्यास कवीचे श्रम व बुद्धि, रसिकांची आस्था व वाचकांची हौस, हीं पोषक होतात. आपल्या इकडील कोणत्याही कवीचें इत्थंभूत–नव्हे साधारण नांव घेण्यासारखें–असें जीवनवृत्त मुळींच प्रसिद्ध नाहीं. त्यामुळें त्यांना आपल्या काव्यांची रचना करण्यास कसकसे श्रम पडले व त्यांच्या प्रासादिक वाणीचा प्रवाह कोणत्या प्रमाणानें चालत असे व तयार झालेल्या कृतीला त्यांना सफाईचा हात द्यावा लागत असे कीं नाहीं, या संबंधानें कांहींच निश्चयानें सांगतां येत नाहीं. पण पाश्चात्य कवींची गोष्ट याहून अगदीं निराळी आहे. तिकडील मुख्य कवींचीं अगदीं विस्तृत चरित्रें उपलब्ध आहेत. त्या चरित्रांचें मनन केलें असतां, असें स्पष्ट दिसून येतें कीं, अशा रीतीनें ज्या ज्या कवींनीं आपल्या कृतीची संगोपना केली, त्या त्या कवींचींच काव्यें सरस व ठसकेदार वठलीं. प्रासादिक पण अव्यवस्थित असें एक काव्य आणि प्रासादिक पण झिलई देऊन गोंडस केलेलें असें एक काव्य, यांतील अधिक चांगलें कोणतें याविषयीं ज्ञात्या रसिक वर्गांत वाद पडावा, ही अचंब्याची गोष्ट आहे. आंग्लांचा प्रासादिक कवि मिल्टन् हा आपल्या अद्भुत वीररसप्रधान काव्याचा आराखडा दहा बारा वर्षेंपर्यंत ठरवीत होता. प्रथम हें काव्य नाटकरूपानें रचण्याचा त्यानें बेत केला व त्याप्रमाणें पात्रें, नाटकाचे अंक व त्यांतील विषय यांचीं त्यानें नक्की टांचणेंही केलीं. परंतु त्यावर त्याचे अनेक वेळां बेत फिरून, नवीन नवीन टांचणें तयार करण्यांत आलीं. तीं सर्व पाहिलीं म्हणजे, 'पॅरॅडाइज

या दोन आर्या पाहिल्या म्हणजे या दोहोंपैकीं कोणती अधिक सरस आहे याचा पंतांनाच निर्णय करितां येईना, म्हणूनच त्यांनीं दोन्ही आर्या आपल्या आर्याभारतांत दाखल केल्या असाव्यात, अशी आमची अटकळ आहे.

लॉस्ट' या महाप्रासादिक काव्याचें प्रस्तुतचें स्वरूप कायम होण्यापूर्वी कवीच्या मनाची किती चलबिचल होत होती, क्रमाक्रमानें त्याच्या कृतीला गति मिळून तिचा विकास व विस्तार कसा होत होता, मित्रमंडळीच्या वगैरे प्रासंगिक सूचनांनीं कवीच्या स्फूर्तीला कसा चेव येत असे व दृढ मननानें हळू हळू त्याला कसें उज्वल रूप प्राप्त होत होतें, हें पाहणें मोठें मनोरंजक आहे, यांत शंका नाहीं. 'पॅरॅडाइज लास्ट' ह्याची रचना चालू असतांना मिल्टन् कवीला एकादे वेळीं स्फूर्तिमांद्य होऊन रचना अगदींच थबकून राहत असे; परंतु एकादे वेळीं स्फूर्ति अशी उसळत असे कीं, आपल्या स्फूर्तीची उकळी मंदावून आपल्या मनांत खेळणाऱ्या कल्पना लुप्त होतील कीं काय, अशी त्याला धास्ती वाटे व तो वेळीं अवेळीं—ऐन मध्यरात्रींही—आपल्या मुलींना उठवून त्यांना आपलें कवित लिहिण्यास बसवी. पण अशा रीतीनें त्याच्या तोंडून साहजिक रीतीनें बाहेर पडलेल्या काव्याची रिकाम्या वेळीं छाटाकाट, साफसुफी व भरण-पूरण करून तें नीटनेटकें करण्यानें त्यांची प्रसादहानि होईल, असें मिल्टन् कधींही मानीत नसे. *पोप कवीची या संबंधाची उद्योगशीलता फारच प्रशंसनीय होती. टेनिसन् हा महाकवीही आपलीं काव्यें भाषा-रचनेनें निर्दोष करण्याविषयीं फारच जपत असे. प्रत्येक शब्द जणूं काय जोखूनच तो योजीत असे! आपलें काव्य मधुर व्हावें, तें ऐकूनच लोकांनीं लोभावें अशा प्रकारचा त्याचा थाटमाट असावा, कल्पना व रचना, अर्थ व ध्वनि यांत मेळ बसावा, अशाविषयीं टेनिसन् कवि मनःपूर्वक प्रयत्न करीत असे. एकंदरींत मुद्दा इतकाच आहे कीं,

---

* जानसन्नें पोप कवीच्या चरित्रांत या गुणासंबंधानें असें म्हटलें आहे:— "Pope was not content to satisfy; he desired to exel, and therefore always endeavoured to do her best. . . . . . He examined lines and words with minute and punctilious observation, and retouched every part with indefatigable deligence till he left nothing to be forgiven. . . . . . . It will seldom be found that he altered without clearness, elegance, or vigour. Pope had perhaps the judgment of Dryden; but Dryden certainly wanted the deligence of Pope."

प्रसादपूर्ण काव्य म्हटलें म्हणजे कवीला त्याच्या रचनेला कांहीं एक श्रम किंवा वेळ लागत नाहीं, असा जो किस्येक खुशालचंद टीकाकारांचा रोंख दिसतो, तो चुकीचा आहे.

आतां कांहीं आवेशी टीकाकारांचें असें म्हणणें आहे कीं, ' हल्लींच्या कवींत ईश्वरी प्रेम व शुद्ध आचरण हीं आढळत नाहींत, म्हणून त्यांच्या काव्यांत प्रसाद नाहीं, याबद्दल आश्चर्य वाटावयासच नको.' परंतु या टीकाकारांनीं 'प्रसाद' हा शब्द आपण कोणत्या अर्थानें योजितों, याचा खुलासा केला असता, तर बरें होतें. ज्या अर्थीं त्यांनीं या गोष्टीची परिस्फुटता केली नाहीं, त्या अर्थीं त्याचा साहित्यशास्त्रास मान्य असलेला अर्थ घेणें भाग आहे व तो अर्थ मागें १३ व्या पृष्ठावर दिलाच आहे. परंतु कवीची ईश्वरी भक्ति आणि शुद्धाचरण या गोष्टींचें काव्यांतील 'पदसौकर्य' किंवा 'अर्थाची सद्य:प्रतीति' यांशीं साहचर्य अवश्यमेव असतें, असा गहन तत्त्वज्ञानांतील अपूर्व सिद्धांत या टीकाकारांनीं कोणत्या गुरूजवळ पैदा केला, हें कळत नाहीं. शिवाय ईश्वरी भक्ति व शुद्ध आचरण हीं पूर्वींच्या कवींत ओतप्रोत तुडुंबलेलीं होतीं, व त्यासंबंधानें अलीकडील कवि ग्रीष्म ऋतूंतील उथळ डबक्यांप्रमाणें कोरडे ठणठणीत आहेत, असें विधान करण्याला, या टीकाकारांना पूर्वींच्या व हल्लींच्या कवींपैकीं कितीकांची इत्थंभूत खासगी माहिती आहे? पूर्वींच्या कवींची माहिती जर केवळ त्यांच्या काव्यांतून व त्यांच्या चाहत्या भक्तांनीं व शिष्यांनीं लिहिलेल्या चरित्रग्रंथांतूनच घेणें असेल, तर हल्लींच्या कवींचीही माहिती त्यांच्या काव्यांतून किंवा त्यांच्या भोक्त्यांनीं लिहिलेल्या टीकापर किंवा चरित्रपर ग्रंथांतूनच घ्या. धारवाडी कांटा हातांत धरणें नसेल, तर प्राचीन व अर्वाचीन कवींची तुलना करण्याच्या भरीस न पडणें, हेंच श्रेयस्कर आहे. या कंपूंतील टीकांचा थोडासा मासला येथें दाखवितों:—" आमच्या जुन्या कवींचें आचरण अत्यंत शुद्ध होतें. ' बोले तैसा चाले ' या कोटींतले ते होते; अर्थात् त्या त्यांच्या सदाचरणाचा ठसा त्यांच्या कवितेवर उमटला आहे. बेकन्-सारखे लांचखाऊ, गोल्डस्मिथ्सारखे दारूबाज व जुगारी, किंवा बायरन्-सारखे व्यभिचारी आमचे कवि नव्हते. प्राणिमात्राचें दुःख पाहून त्यांचें

काळीज तिळतिळ तुटत असे. उन्हानें तप्त होऊन मरणोन्मुख झालेल्या गाढवास गंगेच्या पाण्यानें अंघोळ घालणारे, प्रत्येक वेळीं अंघोळ करून बाहेर येतांच अंगावर थुंकणाऱ्या यवनाचे उपकार मानणारे, दुष्काळग्रस्तांस सरकारचें धान्य देऊन टाकून स्वतःचा जीव धोक्यांत घालणारे , स्वतःस पाहतांच भयानें उडून गेलेल्या पक्ष्यांस पाहून दुःख करणारे आणि आपलें बोट कापलें असतां झालेल्या दुःखामुळें आपला वंशपरंपरेचा खाटकाचा धंदा सोडून देणारे पूर्वींचे सत्पुरुष कवि कोठें? आणि खाविंदास खूष ठेवण्यासाठीं त्यांच्या शिकारीची व्यवस्था ठेवणारे आणि भर दुष्काळांत गांजलेल्या गरीब लोकांपासून सरकारी कराचे पैसे जबरदस्तीनें उकळणारे कवि कोठे? पूर्वींचे कवि मेलेल्या स्त्रियांसाठीं रडत बसणारे नव्हते. झाडें, फुलें, स्त्रिया, आगपेट्या, मुलें, साबण, ग्यास-लेट, परीट, इत्यादिकांवर कविता करण्यांत त्यांस आनंद वाटत नसे; तर ह्या सगळ्या जिनसा ज्यानं निर्माण केल्या, त्या परमेश्वराच्या गुण-वर्णनांत त्यानें दिलेल्या कवित्वशक्तीचा ते उपयोग करीत असत. अधिभौतिक सुखाच्या उत्कट लालसेनें वेडावून जाऊन सृष्टींतील दिसेल त्यावर कविता करणें म्हणजे दुर्लभ कविताशक्तीचा व नरदेहाचा दुरुपयोग करणें होय, अशी त्यांची समजूत होती व म्हणूनच ते सृष्टि-वर्णनांत गुंतून न जातां सृष्टीच्या मूलाकडे गेले. मुलांप्रमाणें एक दोन पेढे खाऊन ढेंकर देण्याइतकी त्यांची क्षुधा मंदावलेली नव्हती व म्हणूनच त्यांनीं पेढे तयार करणाराला आपलासा करून घेतला. अशा ईश्वरी विभूतींच्या काव्यांतला प्रसाद हल्लींच्या काव्यांत आढळला नाहीं, तर त्यांत काय आश्चर्य आहे ?'' रा. आजगांवकरांसारखे टीकाकार कोणत्या विचारसरणीचा आश्रय करून आधुनिक कवींवर वाक्शरांचा कडाका उडवितात, हें वाचकांच्या बरोबर लक्षांत यावें, म्हणून हें लांबलचक अवतरण दिलें आहे. या उताऱ्याचें सूक्ष्म परीक्षण केलें म्हणजे सूर्य-किरणांपुढें धुक्याचा पसारा अल्पावकाशही न ठरतां उडून जातो, तसाच यांतील भासमान होणारा सारांश तत्काळ विलयाला जातो; व टीकाकारांच्या प्राचीनांविषयींच्या अंध प्रौढीचें, किंवा अर्वाचीनांविषयींच्या निष्कारण क्षुद्र बुद्धीचें, किंवा विवेकशैथिल्याचें विशेष कौतुक करावें, या संबंधानें

घोटाळा उडून मन क्षणैक स्तब्ध राहतें ! ही टीका लिहितांना आपण कोणत्या विषयाला उद्देशून लिहीत आहों, याचेंच टीकाकारांना भान राहिलें नाहीं असें दिसतें. संतांचें वर्तन कसें होतें व तें योग्य होतें किंवा नव्हतें, हा मुख्य प्रश्नच नाहीं. तर, आज मराठी भाषेंत जे प्राचीन कवि गाजत आहेत, त्यांच्या काव्यांतील प्रसाद व सरसता हीं त्यांच्या आचरणानें आलीं आहेत, असें आपल्यास सिद्ध करितां येईल कीं काय, इतकाच प्रश्न आहे. याचा नीट–मन क्षुब्ध होऊं न देतां–विचार केला, तर असें दिसतें कीं, प्राचीनांपैकीं संतकवींपेक्षां संत नसणाऱ्या कवींचाच कवित्वदृष्टीनें अधिक मान आहे. आपण आजमितीस काव्यशब्दानें जशा प्रकारचे ग्रंथ समजतों, तशा प्रकारचे ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, यथार्थदीपिका, गीतार्णव, चिदानंदलहरी, दासबोध, वगैरे ग्रंथ नाहींत. त्यांत कित्येक स्थळें कवित्वमय असतील, पण 'काव्य' हें कांहीं त्या ग्रंथांचें सामान्य स्वरूप ठरत *नाहीं. काव्यसंज्ञेनें ज्यांचे ग्रंथ बिनधोक निर्दिष्ट केले जातील, असे ग्रंथकार म्हटले तर वामन, मुक्तेश्वर, विठ्ठल, आनंदतनय, अनंत, रघुनाथपंडित, श्रीधर, मोरोपंत, महीपाति, वीरेश्वर, सामराज;

---

* या संबंधानें रा. रा. वि० का० राजवाडे यांच्या रामदासावरील निबंधांतील पुढील उतारा वाचनीय आहे.—"एकंदर विचार केला असतां, दासबोध हा ग्रंथ काव्य नाहीं. ह्या ग्रंथाचें रूप पद्य आहे, परंतु ह्यांत जे विषय निरूपले आहेत, ते काव्याचे विषय नाहींत. गीता, अमरकोश, वैय्यासिक न्यायमाला, ज्ञानेश्वरी, अनुभवामृत [अमृतानुभव?], यथार्थदीपिका, अष्टांगहृदय, लीलावती. हे ग्रंथ पद्य असूनही ज्याप्रमाणें काव्य नाहींत, त्याप्रमाणेंच दासबोध हा ग्रंथ काव्य नाहीं. खुद्द रामदास आपल्याला कवि म्हणवितात, परंतु दासांच्या कवि या शब्दाचा अर्थ फार व्यापक आहे ......आतां यद्यापि हा ग्रंथ प्रतिभासंपन्न आहे. तत्रापि तो, आपण ज्याला काव्य म्हणून आधुनिक परिभाषेंत म्हणतों, तें नाहीं आधुनिक भाषेंत काव्य ह्या संज्ञेनें ज्या ग्रंथांना आपण ओळखतों, ते सर्वस्वी रसात्मक असावे लागतात. संसारांतील कोणता तरी एक विषय किंवा प्रसंग घेऊन तो रसांनीं रुचिर करून दाखविण्याचें काम कवीचें होय. कवीच्या ग्रंथांत संदेह, संगति, पूर्वपक्ष, सिद्धांत, वगैरे शास्त्रीय परंपरा आणणें म्हणजे काव्याच्या आत्म्याचा शतधा भंग करण्यासारखें आहे. दासबोधांत तर ही परंपरा अथपासून इतीपर्यंत आहे"

—रा. राजवाडेकृत रामदास पृ० ११–१३.

नागजोशी, जगन्नाथकवि इतकेच काय ते मुख्य होत. शिवाय नामदेव, रामदास, तुकाराम, एकनाथ इत्यादिकांचें अभंगात्मक वाङ्मयही अंशतः काव्यांत मोडणारें आहे. परंतु वर निर्दिष्ट केलेल्या वामनादि खास कवींपैकीं कितीकांचीं 'तापलेल्या गाढवास गंगेंत धुतल्याचीं,' 'मुसलमान अंगावर थुंकला असतां तें सहन केल्याचीं,' 'दुष्काळांत धान्याचीं कोठारें लुटविल्याचीं,' 'सघन कसायाप्रमाणें बोट तुटलें असतां दुःखामुळें खाटिकाचा धंदा सोडल्याचीं' व 'आपल्या शेताचा फन्ना पक्षी उडवीत नाहींत म्हणून हळहळल्याचीं' उदाहरणें उपलब्ध आहेत, हें रा. आजगांवकर सांगतील काय? जर अशीं उदाहरणें उपलब्ध नाहींत, तर त्यांचीं काव्यें प्रसादहीन व कवित्वहीन आहेत, असें म्हणण्यास ते तयार आहेत काय? असें म्हणण्यास ते तयार असतील, असें वाटत नाहीं; कारण, त्यांनींच पुढें रा. दामल्यांना 'अत्रचितसुत काशी याचा द्रौपदीस्वयंवर,' 'सामराजाचें रुक्मिणीहरण,' 'सोहिरोबाचीं पदें,' 'आनंदतनयाचें सीतास्वयंवर,' 'मुक्तेश्वराचें महाभारत,' 'पंतांचीं स्फुट काव्यें' 'वामनाचीं स्फुट काव्यें,' इतकेच ग्रंथ एक वेळ वाचून जुन्या मराठी कवींच्या कवित्वाबद्दल खात्री करून घ्यावी, असें बजाविलें आहे. रा. आजगांवकरांनीं रा. दामल्यांना तुकाराम, रामदास, ज्ञानोबा इत्यादिकांचीं काव्यें वाचून प्राचीन कवित्वाची साक्ष पटवून घ्यावयास न सांगतां, ज्या अर्थी वरील काव्यकारांचाच निर्देश केला आहे, त्या अर्थी कवित्वाला, काव्यांत रसाविर्भाव होण्याला व प्रसाद उत्कर्षाला येण्याला संतांच्या आख्यायिकांप्रमाणेंच वर्तन असणें अवश्य आहे, असें त्यांना वाटत नाहीं, असें सरळ फलित होतें. मग * बेकन्‌चा लांचखाऊपणा, गोल्ड्स्मिथ्‌चा दारूबाजपणा व जुगार, बायरन्‌चा व्यभिचार आणि संतांचीं उदार कृत्यें यांचा विषयाशीं विसंगत असा उल्लेख करून, आधुनिक कवींवर घसरण्याचा त्यांचा काय हेतु असेल, तो त्यांना तरी कळला आहे कीं नाहीं, याची आम्हांला शंका येते. बाकी, वेळीं अवेळीं प्राचीनांविषयीं प्रौढी मारण्यास, सद्यःकालीनांविषयीं क्षुद्रबुद्धि

*बेकन हा कवि होता, ही आम्हांला एक नवीच माहिती रा. आजगांवकरांनीं दिली आहे.

दर्शविण्यास व परस्थांविषयीं दोषैकदृष्टि पत्करून घाण उपसण्यास एकदा मनुष्य संवकला म्हणजे त्यानें सरळ विचारसरणीचा अवलंब करावा आणि विषयाची धरसोड करूं नये, अशी त्याविषयीं अपेक्षा करणें वायफळ आहे, असें आम्हांस वाटतें. 'दुष्काळांत प्रजेजवळून कर उकळणें', 'सरकारच्या शिकारीची तजवीज करणें' वगैरे टोले जे रा. आजगांवकरांनीं सद्यःकालीन सरकारी अधिकारावर असणाऱ्या कवींवर हाणिले आहेत, तशा प्रकारचे टोले, प्राचीन कवींचीं इत्थंभूत चरित्रें प्रसिद्ध असतीं तर त्यांपैकींही कित्येकांवर हाणतां आले असते, असें आम्हांस वाटतें. परंतु असे टोले हाणतां आले असते, म्हणून त्यांच्या काव्याचें स्वारस्य व प्रासादिकत्व आज अनुभवास येत आहे, तें उणें झालें असतें, असें खास नाहीं. गोल्डस्मिथ, बायरन्, वगैरे आंग्ल कवि दुराचारी असतील, परंतु त्यामुळें त्यांचीं काव्यें प्रसादहीन झालीं आहेत किंवा त्यांत कवित्व रसरसलेलें नाहीं, असें म्हणण्याची या आधुनिक टीकाकारांना छाती आहे काय? 'झाडें, फुलें, स्त्रिया, अशा विषयावर आधुनिक कवि कविता करितात व ते मेलेल्या स्त्रियांकरितां रडतात' ही गोष्ट त्यांच्या अरसिकत्वाचें प्रमाण म्हणून पुढें आणण्यांत आली आहे. परंतु हे प्रकार प्राचीन कवींनीं कोठें केले नाहींत? वनश्री, उपवनें, वर्षाकाल व इतर ऋतु, संध्याकाळ व इतर दिनभाग, नगरें, रंगमंडप, स्वयंवर, राज्याभिषेक, मुनींचे आश्रम, शुकरंभासंवादासारखे प्रसंग, अशा शेंकडों स्थळीं मुक्तेश्वर, वामन, मोरोपंतादिकांच्या काव्यांत झाडें, फुलें, स्त्रिया, यांच्यावर रचलेलीं कवनें रा. आजगांवकरांना आढळली नाहींत काय? प्राचीन कवींनीं हीं वर्णनें आपल्या मोठ्या काव्यांत घुसडलीं आहेत, तर अर्वाचीन कवि तीं फुटकळ चुटक्यांच्या रूपानें प्रसिद्ध करीत आहेत; यांहून त्यांत तत्त्वदृष्ट्या कांहीं एक निराळा फरक नाहीं. प्राचीन कवि मेलेल्या स्त्रियांकरितां स्वतः रडत नसतील, पण ते रामाला, नळाला, हरिश्चंद्राला, अजाला, रडावयाला लावितात, त्याची काय वाट? शिवाय राम, नळ, उत्तरा, गोपी, चित्रांगदा, दमयंती, तारामती, इत्यादिकांच्या शोकांत प्राचीन कवि, आधुनिकांप्रमाणेंच, स्वतःच्या वेळच्या स्थितीचें दिग्दर्शन करितात, हें कसें? आगपेट्या, साबण, परीट, इत्यादिकांवर अन्योक्ति-

रूपाच्या कविता अलीकडे झालेल्या आहेत. पण याच मासल्याच्या क्षुद्र वस्तूंवर प्राचीनांनीं अन्योक्ति रचिल्या आहेत. कवितेचा नुसता मथळा वाचून नाक मुरडण्यांत अधीरपणा दिसतो. एकनाथांचे ‘ वडवाघुळ,’ ‘ जातें, ’ ‘ पोपट, ’ ‘ महारीण ’ ‘ टिटवी ’ ‘ विंचू ’अशा चमत्कारिक मथाळ्याचे कांहीं रूपकात्मक चुटके आहेत. परंतु ते न वाचतां किंवा वर्णनरीति लक्षांत न घेतां, केवळ मथळे वाचूनच या चुटक्यांना कोणी त्याज्य ठरवील, तर त्याच्या रसिकत्वाचा भोंपळा लागलाच फुटला म्हणून समजावें. मुक्तेश्वरांनीं पक्वान्नांचीं नांवें, मुलांचे निरनिराळे खेळ, द्रौपदीच्या निरनिराळ्या साड्या, चुनड्या व फिरंग्यादिकांचे युद्धप्रकार, यांच्या ज्या याद्या आपल्या ग्रंथांत कोंबल्या आहेत, त्याही भगवत्प्रीत्यर्थच मानावयाच्या काय? जर हें सर्व भगवत्प्रीत्यर्थच समजावयाचें, तर मग ‘ सर्वं खल्विदं ब्रह्म ’ या न्यायाची सवलत आधुनिक कवींनाही देण्यासंबंधानें टीकाकारांनीं कांकूं करितां कामा नये.

प्राचीन कवि भक्ति, शृंगार, वीर, करुण या रसांचे मोठे भोक्ते दिसतात. वामन, मुक्तेश्वर या कवींच्या काव्यांत शृंगाररसाला कित्येक वेळां फाल्गुनी धांगडधिंग्याचें स्वरूप आलेलें दिसतें; मोरोपंत हे या विषयांत क्वचित्‌च वागतात. हल्लींच्या कवींचें लक्ष पाहिलें असतां, तेंही भक्ति, वीर, करुण व शांत यांकडे विशेष झुकतें असें दिसतें. शृंगारांत संभोगशृंगारापेक्षां विप्रलंभशृंगाराकडे त्यांचा ओढा जोराचा दिसतो. शृंगारवर्णनें अत्यंत मर्यादित, सभ्य व रसभरित आढळतात. पुराणेतर संस्कृत काव्यनाटकादिकांच्या वाचनानें आधुनिक कवींचा शृंगाराकडे विशेष कल झाला आहे, अशी एका विद्वान् गृहस्थांस भीति वाटूं लागली आहे. परंतु आधुनिक कवींचा शृंगार कालिदासादि संस्कृत कवींप्रमाणें किंवा मुक्तेश्वरवामनादि प्राचीन मराठी कवींप्रमाणें जहाल गेलेला आढळत नाहीं. मागें एक ‘ प्रणयकोप ’ नांवाचें अश्लील काव्य या गोष्टीस अपवादक म्हणूनच कीं काय, प्रसिद्ध झालें होतें; पण त्याचा ‘ केरळकोकिळ ’ कर्त्यांनीं वेळींच खरपूस समाचार घेतला होता व तशा प्रकारचें दुसरें काव्य अजून आमच्या पाहण्यांत पुन्हां कोठेंही आलें नाहीं. पण आम्हीं येथें जीं विधानें केलीं आहेत, तीं

श्राव्य काव्यांना लागू आहेत, असें समजावें. दृश्य काव्यें जीं नाटकें त्यांत शृंगाररस अश्लीलाच्या परमावधीला जात आहे, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. श्राव्य काव्यांचें प्रत्येक दिशेनें पाऊल पुढें पुढें पडत चाल-लेलें आढळतें, परंतु संगीत नाटकांचा झोंक मात्र असन्मार्गाकडे जास्त जास्त वळत आहे, हें समाजाला फार हानिकारक आहे; कारण वाचक-वर्ग अद्याप संकुचित असल्यामुळें व कानांपेक्षां डोळ्यांवरील संस्कार मनावर दृढतर ठसत असल्यामुळें, समाजांतील अशिक्षित वर्गावर श्राव्य काव्यांपेक्षां दृश्य काव्यांचाच ठसा खोल उमटावा, हें साहजिक आहे. पण प्रस्तुत निबंधाचा विषय केवळ श्राव्य काव्य असल्यामुळें हा नाटकांचा विषय येथेंच सोडणें भाग आहे.

छंदोबंधाकडे लक्ष दिलें तर असें आढळतें कीं, हल्लींच्या कवींच्या काव्यांत प्राचीन मराठी कवींच्या काव्यांपेक्षां छंदोवैचित्र्य अधिक आहे. पूर्वींची बहुतेक कविता अभंग व ओंवी वृत्तांत आहे. विठ्ठल, आनंदतनय, अनंत, मोरोपंत, वीरेश्वर, रघुनाथपंडित वगैरे कवींनीं संस्कृतांतील अक्षरगणबद्ध छंदांत रचना केलेली आहे, पण त्या रचनेपेक्षां अभंग व ओंवी या छंदांतील रचना अधिक आहे. परंतु आजमितीस हें पारडें अगदींच उलटें झालेलें आहे. बहुधा याचें कारण आधुनिक कवींना गाण्याचें अंग कमी असतें, हें असावेसें वाटतें. अक्षरगणबद्ध संस्कृत छंद हल्लींच्या कवींनीं पतकरल्यामुळें त्यांच्या काव्याला बरेंच निबंधन झालेलें आहे. मोजक्या जागेवर त्यांना तोल संभाळून कसरत करावी लागते. भाषेच्या अंगीं लवचिकपणा आणून तिची कमावणी करणें त्यांना भागच पडत आहे. परंतु या गोष्टी त्यांच्या भाषेला निर्बळ व निःसत्व करून सोडीत नाहींत हे खरोखर भूषणावह आहे. छंदोबंध योग्य रीतीनें पाळून भाषेचें डौलदार, ठसकेबाज, शुद्ध व वळणशीर स्वरूप कायम राखणें, ही मोठी कामगिरी अलीकडील कवि करीत आहेत. ही पूर्वींच्या कवींत मोरोपंतांशिवाय दुसऱ्या कोणींही चांगल्या रीतीनें पार पाडण्याचा प्रयत्न केला होता, असें दिसत नाहीं.

अलीकडे कांहीं विद्वान् मराठी काव्यांच्या मागचें अंत्य यमकाचें टुमणें सुटत नाहीं म्हणून वारंवार खेद प्रदर्शन करीत असतात व 'नियमक

काव्यें रचा, म्हणजे तुमची प्रतिभा स्वैर वावरून उज्वल परिपाकाला येईल,' असा एकसारखा टाहो फोडीत असतात. या विद्वानांना आमचा इतकाच प्रश्न आहे कीं, कवितेला साध्या अंत्य यमकांचें बंधन जर असह्य झालें आहे, तर मग प्राकृत किंवा संस्कृत छंदांचें तरी बंधन तिला कां सहन व्हावें? यमकाच्या निर्बंधानें जर प्रतिभेच्या स्वैरविहाराला हरकत येते, तर आम्ही म्हणतों, ती छंदोबंधनानेंही आली पाहिजे. म्हणजे उत्तम काव्याचा परिपाक उतरण्याला वाक्सृष्टींतून यमकानुप्रासाप्रमाणें छंदांनाही अर्धचंद्र मिळाल्यावांचून अप्रतिम काव्य उपलब्ध होणार नाहीं, असा सिद्धांत फलित होऊं पाहतो; अर्थात् हा सिद्धांत अपसिद्धांत आहे. कवितेला पद्य सर्वथैव अवश्य नाहीं हें खरें; परंतु कवितेचें स्वरूप मोहक होण्याला पद्याची गरज आहे; आणि हें मोहकत्व वाढण्याला यमकानुप्रासादि शब्दालंकारांची व उपमोत्प्रेक्षादि अर्थालंकारांची अत्यंत जरूरी आहे. पहिल्या प्रकारच्या अलंकारांनीं तिचें बाह्य स्वरूप चटकदार होऊन, दुसऱ्या प्रकारच्या अलंकारांनीं तिच्या अर्थबोधात्मक जीवभूत शक्तीची फार बहारीची वाढ होते. रानटी समाजापेक्षां सुधारलेल्या समाजांत ज्याप्रमाणें पोषाखाचे व दागिन्यांचे प्रकार वाढत जातात व वस्त्रालंकारांचा उपयोगही वाढत्या प्रमाणावर करण्यांत येतो, त्याप्रमाणेंच कवितेच्या पोषाखाचा व अलंकारांचा इतिहास आहे, अशी आमची समजूत आहे. इंग्रजींत, संस्कृतांत व मराठींतही निर्यमक काव्यें आहेत, नाहींत असें नाहीं; पण इंग्रजींत कवींचा विशेष ओढा यमकाकडेच आहे. संस्कृतांत मात्र अंत्य यमकाकडे कवींचा ओढा दिसत नाहीं. याचें मुख्य कारण इतकेंच कीं, संस्कृतांतील अगदीं प्राचीन वाङ्मय—म्हणजे वैदिक व पौराणिक वाङ्मय—हें बहुश: यमकहीनच आहे व तेणेंकरून मूळापासून संस्कृत वाचकांच्या कानाला अंत्य यमकाची चट न लागल्यामुळें ती पुढेंही जडली नाहीं व यमकाची जरूरच भासूं लागली नाहीं. तरी संस्कृतांत प्रासानुप्रासाचें फारच बंड आहे. आतां मराठीकडे पाहिलें तर मात्र अगदीं उलट स्थिति आढळते. अगदीं पुरातन मराठी काव्यांपासून तों अर्वाचीन काव्यांपर्यंत साध्या अंत्य यमकाचा निर्बंध अगदीं ठरींव होऊन गेलेला आहे. याला केवळ अपवादादाखल अशीं एक दोनच

उदाहरणें दाखवितां येतील. त्यामुळें अंत्य यमक मराठीच्या अंगीं इतकें जडून गेलें आहे कीं, तें तोडून काढतांना मराठी कवितेच्या अंगाचा लचका निघून रक्तस्राव होईल, असेंच आम्हांस वाटतें. साधें अंत्य यमक आमच्या इतकें आंगवळणीं पडलें आहे कीं, तें साधण्यास कवींना फारसे श्रम पडतात, असें नाहीं.

सुधारलेल्या समाजाच्या चालीरीती पाहून, 'हे लोक एवढे निर्बंध बिनबोभाट संभाळून आपले व्यवहार बिनतक्रार कसे पार पाडीत असतात,' यांचेंच एकाद्या रानवटाला मोठें नवल वाटत असावें व 'हे मनुष्य या समाजबंधनांतून सुटले, तर यांची शक्ति स्वैर संचार करून केवढीं अचाट कामें करील,' अशी तो आपल्या मनाशीं अटकळ बांधीत असावा, परंतु त्या समाजांतील व्यक्तींना मात्र कोणतीही अडचण विशेष भासमान न होतां, त्या आपापलीं कर्तव्यें यथासांग करीत असाव्यात; तसाच कांहींसा प्रकार वरील विद्वान्, उपदेशक व आधुनिक कवी यांचा या बाबतींत आहे, असें दिसतें. 'निर्यमक कविता करा' असा जो आग्रहाचा उपदेश कवींना करण्यांत येतो, त्यांत विशेषसा मतलब नाहीं. यमकाची अडचण ज्या कवीला भासेल, तो यमकास फांटा देईल; व त्यानें तसें केलें तर त्याचें आम्हांला विशेष सुख किंवा दुःखही वाटणार नाहीं. परंतु कवींची यमकासंबंधानें तक्रार नसतां व लोकमतही पूर्व वहिवाटीमुळें—आनुवंशिक संस्कारांमुळें—यमकास अनुकूल असतां, यमकहीन रचना हल्लींचे कवि करीत नाहींत, म्हणून खेदप्रदर्शन करणें, आमच्या दृष्टीला हास्यास्पद दिसतें. कोटीप्रतिकोटी लढवून, यमकांचें काव्याला प्रयोजन नाहीं, असें जरी सिद्ध झालें—व तें तसें सिद्ध झालें आहे, हें आम्ही कबूल करितों—तरीपण जोंपर्यंत आनुवंशिक संस्कारानें आमचे कान भारलेले आहेत, तोंपर्यंत ती सिद्धता मनाला पटणें शक्य नाहीं. कुंकुमतिलक हें जसें हिंदु स्त्रियांचें सौभाग्यचिन्ह आहे, त्याप्रमाणेंच यमकप्रचार हें महाराष्ट्र काव्यसुंदरीचें एक सौभाग्यचिन्हच आहे. तर्कशास्त्राची कसोटी लावून तें चिन्ह सौंदर्यास अवश्य नाहीं, असें ठरविण्याची तसदी घ्यावयाची जरूर नाहीं.

४. येथवर ‘ प्राचीन व अर्वाचीन कवि ’ हा भेद कोणत्या तत्त्वांवर झाला आहे व या दोन वर्गांतील कवींत विषय, रचना व भाषा यासंबंधानें काय फरक आहे, याचा ऊहापोह झाला. आतां किरकोळ मुद्यांचा विचार करणें आहे.

५. आधुनिक कवींवर एक असा आरोप लादण्यांत आला आहे कीं, “ हे परतंत्रावस्थेंत असून अभिमानशून्य आहेत. जुने मराठी कवि अगदीं स्वतंत्रवृत्ति होते व स्वतंत्रता हें कवितादेवीचें मुख्य निवासस्थान असल्यामुळें, ती त्यांच्या ठायीं उत्कटत्वानें वास करीत होती. स्वतंत्र मनुष्यांच्या मनांतून स्वतंत्र विचार बाहेर पडतात, गुलामांच्या मनांतून पडत नाहींत.” परंतु ह्या टीकाकारांच्या या विधानाला फारसा आधार आहे असें दिसत नाहीं. ‘ ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, रामदास व मोरोपंत या चौघांशिवाय इतर कांहीं कवि महाराष्ट्राच्या पारतंत्र्यावस्थेंत होऊन गेले असून, त्यांच्या कवितेंत पारतंत्र्यासंबंधाचा तिरस्कार अनेक ठिकाणीं प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणें आढळतो, ’ अशी या टीकाकारांनीं आपल्या वरील विधानाला प्रस्तावना केलेली आहे. परंतु प्राचीन मराठी कवींच्या काव्यांतील स्वतंत्र बाण्याचे राष्ट्रीय उद्गार, जेव्हां अगदीं डोळयांत तेल घालून कोनेकोपेर धुंडाळून पहावे, तेव्हां कोठें हातीं लागतात व ते तरी काय, हाताच्या बोटावर मोजावे इतकेंच! याला कदाचित् ‘ दासबोध ’ हाच काय तो ठळकसा अपवाद आणतां येईल. परंतु आजची स्थिति अशी नाहीं. आजकाल आधुनिक कवींच्या काव्यांत स्वतंत्र बाणा प्रस्फुरत असून, कांहीं कांहीं कविता तर सर्वस्वींच त्याला वाहिलेल्या आहेत. स्वतंत्रतादेवीस उद्देशून रचलेलीं काव्यें, देशस्थितिगर्भ व उत्तेजक अशीं ऋतुवर्णनें, ‘ राजा शिवाजी ,’ ‘ शिवाजीचरित्र,’ ‘ शिवछत्रपति काव्य,’ ‘ श्री शिवछत्रपति महाराज काव्य,’ ‘ राणा प्रतापसिंह ,’ ‘ तानाजी मालुसरे,’ ‘ नाना फडनीस काव्य,’ ‘ बाजीराव काव्य,’ मराठ्यांच्या इतिहासांत मराठ्यांच्या पराक्रमानें चिरस्मरणीय झालेल्या गडादिकांचीं वर्णनें, विनायक कवीचीं ‘ऐतिहासिक स्त्रियांवरील गाणीं,’ ‘वीरमाता द्रौपदी,’ ‘ विदुलापुत्रानुशासन,’ ‘ भीमकर्मा राघोबा,’ रा. द० कोंघाटे यांच्या ‘ मित्रा विहंगा ’ या काव्यासारखीं इतर कवींचीं काव्यें,

'भट्टवंश काव्य,' 'स्वदेशी तुकाराम,' देशभक्ताचे उसासे, केशवसुताची 'तुतारी,' 'नव्या दमाचा शिपाई' वगैरे फुटकळ काव्यें, व सर्वांस मुकुटाप्रमाणें शोभणारें 'राष्ट्रीय गीत,' ही स्वातंत्र्येच्छेनें फुरफुरणारी काव्यसंपत्ति आधुनिक कवींची आहे, व हिच्याशीं जिची क्षणभरही तुलना करितां येईल अशी प्राचीन कवींची संपत्ति अजून उपलब्ध झालेली नाहीं. पुराणकृतींना फाजील महत्त्व देऊन, नवीन कृतींची अवहेलना करावी, असा मोह अनेक टीकाकारांना पडतो; कारण त्या कृत्यानें आपण पुराणाभिमानी व अलीकडच्यांपेक्षां शहाणे अशी दुहेरी प्रौढी त्यांस मिरवावयास सांपडते. अशी स्थिति पुरातन कालापासूनच चालत आली आहे. म्हणूनच ज्याप्रमाणें कालिदासास—

'पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि काव्यं नवमित्यवद्यम्'

असें सांगावें लागलें, त्याप्रमाणेंच

चमत्कार! 'तें पुराण तेथुनि
सुंदर, सोज्वल, गोडें, मोठें!'
'अलिकडलें तें सगळें खोटें!'
म्हणती धरुनी ढेरीं पोटें;
धिक्कार अशा मूर्खांलागुनि!

असे उद्गार अत्यंत त्रासानें व बेपर्वाईनें, 'केशवसुतास'ही काढावे लागले आहेत. विषयामध्यें खोल डोकें घालून स्वतंत्र बाण्यानें विवेकबुद्धि न चालवितां, जो टीकाकार टीका करितो, तोच दुराग्रहाचा बंदा गुलाम होतो. त्याची दुसऱ्यावरील टीका म्हणजे गुलामाचें पुटपुटणेंच होय. पुराणवस्तूंचा अभिमान आम्हांलाही आहे. परंतु पुराणवस्तूंच्या अभिमानाला अर्वाचीन वस्तूंच्या उपमर्दाची पुस्ती मिळाल्यावांचून तो बरोबर खुलतच नाहीं, इतकें मानण्यापर्यंत आमची मजल गेलेली नाहीं. *पुराणांचे गुणानुवादन व अर्वाचीनांचें

*या विषयासंबंधानें आंग्ल पंडित जॉन्सन् यानें आपले विचार स्पष्ट नमूद केले आहेत. ते विचार फार मार्मिक असल्यामुळें येथें उतरून घेतोः—

"Antiquity, like every other quality that attracts the notice of mankind, has undoubtedly votaries that reverence it, not from reason, but from prejudice. Some seem to admire indiscriminately whatever has been long preserved, without considering that time has sometimes cooperated

नसतेंच दोषाविष्करण, हें दुतारी तुणतुणें जर रा. आजगांवकरांसारखे टीकाकार चव्हाट्यावर मोठ्या रंगांत येऊन वाजवीत बसले नसते, तर आम्हांलाही त्यांच्यावर तुटून पडण्याचें कारण नव्हतें.

असो, वर जीं कित्येक काव्यनामें आम्हीं नमूद केलीं आहेत, त्यांवरून आधुनिक कवींच्या डोक्यांत स्वतंत्रतेचे विचार प्राचीन कवींपेक्षां जास्ती जोरानें खेळत आहेत; स्वातंत्र्यस्फूर्ति राष्ट्रांत येऊन त्याला चेतन मिळावें म्हणून रजपूत व मराठे यांच्या पूर्व इतिहासांतील विषय घेऊन किंवा त्या धोरणाचे पौराणिक विषय निवडून, त्यांवर ते रचना करीत आहेत. हें कृत्य प्राचीनांच्या हातून झालेलें नाहीं. मग प्राचीनांच्या काव्यांतील स्वराष्ट्राविषयींचे कोनाकोपऱ्यांतील उल्लेख काढून, त्यांच्या राष्ट्रीयत्वाचे गोडवे गाण्यास कित्येक टीकाकार फार हापापलेले कां दिसतात, व हल्लींच्या कवींची ठळक दिसणारी स्वतंत्रवृत्ति त्यांच्या नजरेंतून कां हुकते? हा प्रश्न उभा राहतो. खालीं टीपेंत जॉन्सन् साहेबांनीं या प्रवृत्तीचीं जीं कारणें दिलीं आहेत, त्यांहून निराळें असें एक जबरदस्त कारण आजमितीस महाराष्ट्रांत दिसून येत आहे; तें हें कीं, प्राचीन कवींच्या काव्यग्रंथांशिवाय इतर प्राचीन ग्रंथ नसल्यामुळें व या कवींवर एका आधुनिक वाग्वीरानें टाळकुटेपणाचा आरोप लागू केल्यामुळें, या कवींची तरफदारी करण्यासाठीं–त्यांचा स्वदेशाभिमान, राष्ट्रीयत्व सिद्ध करण्यासाठीं–हा आटापेट आहे; आणि आजमितीस राजकारणी विषयांचा निदिध्यास वर्तमानपत्रांना लागल्यामुळें व तींच निरंतर नजरेपुढें येऊन या टीकाकांराच्या डोळ्यांस दिपवीत

---

with chance; all perhaps are more willing to honour past than present excellence; and the mind contemplates genius through the shades of ages, as the eye surveys the sun through the artificial opacity. The great contention of criticism is to find faults of the moderns, and the beauties of the ancients. While an author is yet living we estimate his powers by his worst performance, and when he is dead we rate them by his best.

—Preface to Shakespeare.

असल्यामुळें, आधुनिक काव्यांतील स्वतंत्रतेचा प्रवाह त्यांना दिसत नाहींसा झाला आहे.

६. "पूर्वीच्या कवींस प्रसिद्धीची किंवा द्रव्याची फारशी आकांक्षा नव्हती; हल्लींच्या कवींस 'मासिकमनोरंजनांत' किंवा 'विविधज्ञान-विस्तारांत' आपलें नांव चमकलें म्हणजे मोठी धन्यता वाटते." अशा तऱ्हेचा एक आक्षेप आधुनिक कवींवर घेण्यांत आला आहे. कवि जें काव्य करितो, तें कांहीं कवडीचुंबकाच्या खजिन्याप्रमाणें जमिनींत पुरून टाकण्याकरितां करीत नसतो तें प्रसिद्ध व्हावें, तें रसिकांच्या नजरेस पडावें, त्यांतील गुणदोष कळावे व त्याच्या अंगीं गुण असल्यास त्यांच्या योगानें वाचकांस आनंद व ज्ञान हीं प्राप्त व्हावीं, हाच कवींचा हेतु असतो. मम्मटाचार्यांनीं काव्यप्रकाशांत काव्य रचण्याचे जे हेतु सांगितले आहेत, त्यांत यश व धन यांचाही समावेश केला आहे; कारण, त्यांत वास्तविक कांहीं एक वाईट नाहीं. संस्कृत कवींना द्रव्याची किंवा यशाची अपेक्षा नसती, तर ते आपलीं काव्यें व नाटकें मोठमोठ्या समाजांपुढें कशाला प्रदर्शित करिते? व समाजानें नाकें मुरडलीं असतांना, आपल्या गुणांची पूर्ण खात्री बाळगून, वैतागून, 'ज्यांना आमची कृति पसंत नसेल, त्यांच्या करितां ती आम्हीं रचलीच नाहीं. आमच्याशीं समानधर्म आजमितीस कोणी तरी असतीलच किंवा पुढें उत्पन्न होतीलच—कारण पृथ्वी ही अफाट आहे व काल अनंत आहे—त्यांच्यासाठींच आमचा प्रयत्न आहे,' अशा तऱ्हेचे शेंडींत राख घातल्यासारखे जे उद्गार कित्येक संस्कृत कवींनीं काढिले आहेत, त्यांतील तरी इंगित काय बरें असावें? आपलीं काव्यें रसिकांपुढें यावीं, अशी प्राचीन कवींना इच्छा नसती, तर 'रामकृष्णचरणीं समर्पित ग्रंथ हा रसिकचित्त तर्पित; । न प्रमादभव दोष राहवू; सत्प्रमोदनयनोद वाहवू. ॥' अशी आशंसा मोरोपंत 'कृष्णविजया'च्या अंतीं कां करिते? पंतांना जर काव्याच्या प्रसिद्धीची आकांक्षाच नसती, तर ते 'विनवितसें साधूंतें अणिकही देऊन हांक विनवीन' अशी बांग ब्रह्मोत्तरखंडांत कां फोडते, आपलीं काव्यें काशींत नेऊन तेथील पंडितांचें शिफारसपत्र कां मिळवते, राम-

जोशांसारख्या कीर्तनकारांच्या स्वाधीन आपलीं काव्यें कां करिते आणि "रामसुत मयूर म्हणे, जाणेल निका मनीं चमत्कृतिला। तुमज्जुनि कथे! न मानिला तुज तेविं निकाम नीच मत्कृतिला ॥" "काव्य करावें म्यां, नच वचकावें, दूषितो, परि लघूस । कां न सदन बांधावें? कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस. ॥" अशा तऱ्हेच्या भवभूतीच्या थाटाच्या दर्पोक्ती तरी अनेक ठिकाणीं कशाला नमूद करिते? तसेंच ज्ञानेश्वर महाराजांनीं भावार्थदीपिका पुरी केली, त्या वेळीं त्यांना धन्य धन्य वाटून त्यांनीं उद्गार काढिले कीं, 'मी हीनबळ मुका असून, "हा ग्रंथ सागरायेवढा। उतरोनि पैलपाडा । कीर्तिविजयाचा झेंडा । नाचे जे कां" हें सर्व सज्जनांच्या कृपेचेंच फळ आहे.' पुढें त्यांनीं ग्रंथाअंतीं परमेश्वराजवळ जें प्रसाददान मागितलें आहे, त्यांतही 'आणि ग्रंथोपजीवियें। विशेषें लोकीं ये । दृष्टादृष्टविजयें । होआवें जी! ॥' असा एक वर याचिला आहे. मग यावरून आपला ग्रंथ प्रसिद्ध व्हावा व त्यामुळें किर्तिविजयही लाभावा, अशी कवीची अपेक्षा नव्हती, असेंच सरळ अनुमान निघतें काय? पण कवीच्या मनांत आपलें काव्य प्रसिद्ध व्हावें व तत्प्रीत्यर्थ जीं सरळ साधनें असतील त्यांचा शक्य तेवढा उपयोग करून घ्यावा, असें असतें, हें सिद्ध करण्याला प्रमाणच नको. वक्ता आपलें भाषण लोकांनीं ऐकावें म्हणून बोलतो कीं नाहीं; टीकाकार आपली टीका लोकांनीं वाचावी म्हणून लिहितात कीं नाहीं; गवई आपलें गाणें लोकांच्या कर्णरंध्रावर यावें म्हणून गातो कीं नाहीं; चित्रकार आपलीं चित्रें लोकांनीं पाहावीं म्हणून चितारतात कीं नाहीं; वगैरे गोष्टी सिद्ध करण्यासाठीं प्रमाणसामग्रीची जुळवाजुळव करणें म्हणजे, सूर्य प्रकाशत आहे कीं नाहीं हें दाखविण्यासाठीं मशालींची तयारी करणें, किंवा पाणी प्यायलें असतां तहान भागते कीं नाहीं हें निर्णीत करण्यासाठीं प्रयोगशाला व यंत्रांचे संच तयार करणेंच आहे, असें आम्हांस वाटतें. मग हातचें कांकण इतकें स्पष्ट दिसत असतां, हल्लींचे कवि आपलीं काव्यें वर्तमानपत्रांतून किंवा मासिकपुस्तकांतून प्रसिद्ध करितात, तेव्हां त्यांना अल्प श्रमानें कीर्ति मिळविण्याची नीच लालसा आहे किंवा त्यांत त्यांचा कांहीं अनुदार हेतु आहे, असें सरसहा विधान करणें अत्यंत अप्रबुद्धपणाचें आहे.

"आपल्यास जें काय ज्ञान झालें, तें इतर जनांस करून द्यावें, हा उदात्त हेतु प्राचीन कवींचा होता;" तर अर्वाचीन कवींचाही तोच हेतु असून, शिवाय निरनिराळ्या मानवी मनोवृत्ति निरनिराळ्या प्रसंगीं उचंबळून जे चमत्कार घडतात, त्यांचें हुबेहूब प्रतिबिंब ज्यांत आहे, अशीं काव्यें लोकांपुढें मांडावीं; मनोरंजनद्वारा सद्यः-स्थितीचें चित्र त्यांच्या नजरेपुढें चितारावें; लोकांच्या मनांत सत्त्व-संपन्न ओजस्तेज इत्यादि गुणांचा उद्भव करून, त्यांस सत्याचे पाठीराखे व असत्याचे द्वेष्टे, न्यायाचे रक्षक व अन्यायाचे अंतक बनवावें; सरस सृष्टिवर्णनांनीं त्यांचें चित्त प्रसन्न करावें, आणि सभ्य विनोदानें त्यांना रंजवावें; अशा प्रकारचे अनेक हेतु हल्लींच्या कवींचें आहेत. व तसेच ते प्राचीन कवींचेही होते, असें त्यांच्या काव्यांवरून ढळढळीत दिसतें. परंतु रां. आजगांवकरांसारख्या टीका-कारांना प्राचीन कवींचा 'ज्ञानदान' याशिवाय दुसरा हेतुच दिसत नाहीं, हा कशाचा परिणाम आहे बरें ? हा दुराग्रहाचा पक्षघात होऊन एकांगी बनलेल्या बुद्धीचा परिणाम असावा, असें आमचें निदान आहे.

७. पूर्वींच्या लुंग्यासुंग्या कवींचा व्यासंग किती दांडगा होता व त्यां-च्यांत तेज कितपत होतें, हें त्यांचीं काव्यें वाचलीं म्हणजे तत्काळ कळणार आहे. परंतु, प्रसिद्ध व सर्वमान्य असे जे १०-१२ प्राचीन कवि आहेत त्यांचा व्यासंग जबर होता, यांत शंका नाहीं. त्यांनीं जातीनें हिंदुस्थानभर प्रवास केले होते; त्यांनीं सामाजिक, राजकीय व धार्मिक स्थितींचें निरीक्षण करून तिचा थोडा फार उल्लेख विषयानुरोधानें आपल्या काव्यांत केलेला आहे; त्यांची प्रतिभा तेजस्वी होती; वगैरे वगैरे गोष्टी आम्हांला कबूल आहेत. परंतु यावरून हल्लींचे कवि व्यासंगहीन, ज्ञानहीन, प्रतिभाहीन व उदात्तहेतुहीन आहेत, हें कसें सिद्ध होतें, तें आमच्या सरळ बुद्धीला आकलन करितां येत नाहीं. ज्ञानप्र-देशाचा व ज्ञानार्जनाच्या साधनांचा विचार केला असतां, असें दिसून येईल कीं, पूर्वीं ज्ञानप्रदेश जरी संकुचित होता, तरी ज्ञानार्जनाचीं साधनें सुलभ व विपुल नव्हतीं. त्यामुळें महाकष्ट करावे, तेव्हां कोठें थोडासा ज्ञानसंचय वाढे. यामुळें पूर्वकवींनीं जें काम बजावलें, तें क्लेशानें साध्य

होणारें होतें, हें उघड आहे. पण हल्लींच्या स्थितीकडे पाहिलें तर आपाद-शिखा क्रांति झालेली दृष्टीस पडते. आधुनिक कवींच्या पुढें ज्ञानप्रदेश संकुचित नसून विपुल–किंबहुना निरवधिक–आहे; आणि ज्ञानार्जन–साधनेंही विविध व सुलभ आहेत. त्यामुळें हल्लीं पूर्वींपेक्षां जास्ती ज्ञान कमी कष्टानें अर्जितां येतें, पण ज्ञानप्रदेशच वाढल्यामुळें एकंदरींत हल्लींही कष्ट, श्रम व व्यासंग हे सारखे चालू ठेविणें भाग पडतें. पूर्वीं जें ज्ञान संपादण्याला ग्रंथकारांना प्रवास करणें जरूर पडे, त्याच्यापेक्षां कितीतरी पट ज्ञान आजच्या ग्रंथकारांना घरीं बसून वर्तमानपत्रें, मासिकें, प्रवासवृत्तें, स्थलवर्णनें, ऐतिहासिक व सामाजिक विषयांवरील ग्रंथ यांनीं होत असतें. शिवाय पूर्वींचे ग्रंथकार–आणि हे सर्व प्राचीन कवि याच नांवानें मोडतात–व हल्लींचे ग्रंथकार, यांत एक मोठी तफावत आहे; ती ही कीं, हल्लींच्या काळीं गद्यवाङ्मय हें अत्यंत महत्त्वाचें झालें आहे, व या वाङ्मयाचा वस्तुतः प्राचीन काळीं तर जन्महीं झाला *नव्हता. त्यामुळें पूर्वीं सर्वच कामांचा भार जो कविवर्गावर पडत असे, तो, श्रमविभागतत्त्व अंमलांत आल्यामुळें, हल्लीं बराच हलकावला आहे. हल्लीं ‘ काव्य ’ हें ज्ञानार्जनाचें मुख्य साधन नसून, ज्ञानदानाचें काम प्रामुख्यानें गद्यवाङ्मयाकडे ओघानेंच आलेलें आहे. तरी पूर्वींच्या कवींच्या व्यासंगाच्या ज्ञानाचे गोडवे गातांना, त्यांची तुलना आधुनिक कवींशीं न करितां, आधुनिक ग्रंथकारवर्गाशीं करून पाहणें, हेंच खरें न्यायाचें व निष्पक्षपाताचें करणें होईल. आणि अशी तुलना करण्याकडे प्रवृत्ति झाली व न विचकतां, न कचरतां, सत्याची कास धरून, विवरण व विवेचन केलें, तर व्यासंग कोणाचा दांडगा आहे, याविषयीं फारसा मतभेद होण्याचें भय राहणार नाहीं.

८. आतां हल्लीं ‘ महाकवि ’ आहेत कीं नाहीं याचा विचार करूं. प्रथम साहजिकच असा प्रश्न पुढें उभा राहतो, कीं, ‘ महाकवि ’ म्हणजे

---

*पूर्वींचे शिलालेख, फर्मानें, बखरी, वगैरे कांहीं लिखितांकडे बोट दाखवून वरील विधानास कोणी बाध आणण्याचा प्रयत्न करितील; पण आज मितीस ‘गद्यवाङ्मय’ या संज्ञेनें आम्ही ज्याचा बोध करितों, त्यांत या लिखितांचा औचित्यानें अभिनिवेश करितां येईल, असें वाटत नाहीं.

काय? हा काय पारिभाषिक शब्द आहे, कीं उत्तम कवि- कवित्व गुण ज्याच्यांत उत्कटत्वानें वसत आहे असा कवि—इतकाच याचा अर्थ आहे? संस्कृत साहित्यशास्त्रांत 'महाकाव्य' म्हणून एक पारिभाषिक शब्द आहे. त्याचें लक्षण असें आढळतें:—

नगरार्णवशैलर्तुचंद्रार्कोदयवर्णनैः ।
उद्यानसलिलक्रीडामधुपानरतोत्सवैः ॥ १
विप्रलंभैर्विवाहैश्च कुमारोदयवर्णनैः ।
मन्त्रद्यूतप्रयाणादिनायकाभ्युदयैरपि ॥ २
एतैरुपनिबद्धं यत्तन्महाकाव्यमिष्यते ।
एषामष्टादशानां वै कैश्चिन्न्यूनमपीष्यते ॥ ३ ॥
सर्गबंधो महाकाव्यमिति केचित्प्रचक्षते ।
असर्गबंधमपि च महाकाव्यमितीष्यते ॥ ४

—श्रीकृष्णकविकृत मन्दारमरंदचंपू.

तेव्हां जर या प्रकारचें 'महाकाव्य' रचणारा तो 'महाकवि' अशी परिभाषा इष्ट असेल, तर अशा प्रकारचे 'महाकवि' आधुनिक कविवर्गांत निर्माण झालेले आहेत. कै० बापूसाहेब कुरुंदवाडकर यांचें 'भट्टवंश-काव्य', रा. लेंभ्यांचें 'सुरतरंगिणी काव्य', रा. गणेशसुत गुणे यांचें 'श्रीसुदामचरित्र,' रा. स० मो० भिडे यांचें 'बाजीराव काव्य', रा. खरे यांचें 'यशवंतराव महाकाव्य', रा. म० मो० कुंटे यांचा 'राजा शिवाजी', रा. ग० स० लेलें यांचें 'शिवाजीचरित्र', राधा-रमणांचें 'नानाफडनीसकाव्य' रा. मुझुमदारांचें 'श्री शिवाजी छत्रपति महाराज काव्य,' हीं सर्व वरील साहित्यशास्त्रोक्त लक्षणांनीं युक्त असल्यामुळें 'महाकाव्यें' ठरतात व त्यांचे कवि साहित्यशास्त्राच्या परिभाषेनें 'महाकवि' होत. परंतु जर 'महाकवि' हा शब्द 'उत्तम कवि', 'ज्याचें कवित वाचलें असतां अंतःकरण उचंबळून येतें, चंद्र-दर्शनानें चंद्रकांतमण्याला जसे पाझर फुटतात, तसें ज्याचें काव्य वाचून वाचकांचें अंतःकरण द्रवतें' असा घेणें असेल, तर 'महाकवित्व' फुटकळ खंडकाव्यावरूनही ठरण्यासारखें आहे. 'शवगर्तेवरील विलाप-रव' या एकाच लहानशा चुटक्यानें ग्रे कवि इंग्लंडांतील महाकवींत

मोडतों, ब्राउनिंग, हीमन्स्, वर्डस्वर्थ्, कॅम्बेल, शेले, इत्यादि आंग्ल कवि केवळ स्फुट खंडकाव्यांनींच लोकांचे प्यारे होऊन महाकविपदाला चढले आहेत, रघुनाथपंडितांचें नैषध काव्याच्या आधारानें रचलेलें दमयंती-स्वयंवर हें एकच* काव्य प्रसिद्ध असतां, ते महाराष्ट्रांतील महाकवींच्या पंक्तींत रसिक मर्मज्ञांच्या संमतीनेंच बसले आहेत. मोरोपंतांची सर्व कविता बुडून, जरी त्यांची नुसती, 'केकावली'च आजमितीस उपलब्ध असती, तरी त्या एकाच कृतीवरून ते 'महाकवि' या पदवीला लायक ठरले असते, असें विधान कांहीं विद्वज्जनांनीं केलेलें आहे, तर मग आधुनिक कवींच्या कांहीं फुटकळ काव्यांनींही जर रसोत्पत्ति होत असते, अंत:करणाची चळवळ उडते, काव्याशीं वाचकाचें मन तात्पुरतें समरस होतें, असा आमचा प्रत्यक्ष अनुभव आहे, तर आधुनिक कवींत, महाकवि नाहींत असें विधान आम्हीं कोणत्या तोंडानें करावें? रा. चिपळूणकर, लेंभे, कानिटकर, चंद्रशेखर, केशवसुत, ना० वा० टिळक, राधारमण, महाजनी, मोगरे, चिंतामणि पेंठकर, माधवानुज, वगैरे कवींचीं खंडकाव्यें वरील काव्यकसोटीला उतरतील, अशी आमची मनोदेवता सांगते. काव्यमर्म हें स्वसंवेद्य, आत्मप्रत्यय आहे. तें केवळ मनोगम्य असल्यामुळें अंगुलिनिर्देश करून दुसऱ्यास दाखवितां येणार नाहीं, त्यामुळें या कवींची काव्यें वाचून जर कोणाची आमच्यासारखी स्थिति होत नसेल, तर त्यास आमचा किंवा त्यांचा तरी काय इलाज? त्यांतून मागें सांगितल्याप्रमाणें हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, मराठी काव्याची सांप्रतची संक्रमणावस्था आहे. जुन्या व नव्या वातावरणाचें मिश्रण हल्लीं चालू आहे. हें मिश्रण कालक्रमानें बेमालूम होणारें आहे. तरी तोंपर्यंत वाचक व कवि यांचें नेहमींच पूर्ण तादात्म्य होईल, अशी अपेक्षा करणें म्हणजे आपण होऊन निराशेचें बिऱ्हाड आपल्या चेत:सदनांत बसविण्यासारखें आहे, तेव्हां सर्व परिस्थितीचा विचार करून पाहिलें असतां, केवळ आपला मनोभंग होण्यासारखी आजची महाराष्ट्र काव्याची स्थिति नाहीं व कालांतरें हें नव्या दमाचें रोप उजवरण्याचीं सर्व शुभ

*अलीकडे 'गजेंद्रमोक्ष' व 'रामदासवर्णन' हीं दोन रघुनाथपंडितविरचित प्रकरणें रा. वि० का० राजवाडे यांना सांपडलीं आहेत.

लक्षणें दिसत आहेत, असें आढळेल. अशा वेळीं ग्रंथकारसंमेलनासारख्या संस्थांनीं करावयाचें म्हणजे इतकेंच कीं, आधुनिक कवींचा बोज राहील, त्यांचीं उत्तम उत्तम काव्यें केवळ विपुल वाचकवर्ग नसल्यामुळेंच अंधारांत पडलीं असतील तर तीं बाहेर येतील, व त्यांच्या काव्यांचें सहानुभूतिपूर्वक उत्तेजक परीक्षण होईल, अशी व्यवस्था करण्यांत यावी. पूर्वीच्या कवींप्रमाणेंच हल्लींचे कवीही द्रव्यार्जनावर कटाक्ष ठेऊन काव्यसेवा करीत नाहींत. जर कवि द्रव्यावरच नजर ठेविते, तर वर्तमानपत्र व मासिकपुस्तकें यांना फुकट कविता कधींच मिळत्या ना. कवि केवळ स्फूर्तीच्या उद्रेकानेंच, केवळ मनाची हौस—एक प्रकाराची तळमळ—पुरविण्यासाठींच काव्यें रचीत आहेत; व तीं प्रसिद्ध करण्याच्या साधनांचा ते उपयोग करून घेत आहेत. हीं साधनें अपुरीं आहेत, तरी तीं वाढविण्याचें श्रेय संमेलनानें घेतलें म्हणजे सांप्रतच्या स्थितींत त्यानें मोठीच कामगिरी बजाविली, असें म्हणण्यास कांहींएक हरकत नाहीं.

९. येथपर्यंत आम्हीं या विषयाच्या मंथनाला थोडीबहुत मदत केलेली आहे. हें मंथन चाललें असतांना घुसळण्याच्या आवेशानें कोणास झटका लागला असण्याचा संभव आहे. परंतु हा झटक्याला उलट झटका आहे, हें त्यांनीं लक्षांत ठेवावें. एकमेकांवर टीका करणें हेंही कवित्वाला बाधक आहे, अशी कांहीं टीकाकारांची विक्षिप्त समजूत आहे. ड्रायडन, पोप, गोल्डस्मिथ, वगैरे आंग्ल कवि आपल्या समकालीन विद्वज्जनांवर, प्रसंग आला असतां, कठोर टीका करण्यास माघार घेत नसत. परंतु त्यानें त्यांचें काव्य हीनगुण झालें, असें थोडेंच आहे. पोप कवीचीं 'Essay on Criticism' 'Dunciad' व ॲडिसनवरील कडाका, यांत तर कवित्वशक्ति अगदीं उत्कटत्वास गेली आहे, असें रसिकांचें मत आहे. आमच्या जुन्या कवींतही आपल्या प्रतिपक्षावर घाव हाणणारे कवि नाहींत, असें मुळींच नाहीं. तुकाराम, रामदास, नामदेव, यांनीं आपल्या समकालीन लोकांवर, शास्त्री, पंडित, हरिदास, इत्यादि कांवर कडकडीत कोरडे ओढलेले आहेत. त्यांनीं त्यांत कोणाचा नामनिर्देश केलेला नाहीं, इतकेंच. मोरोपंतांनीं आपल्या काव्याला दूषण देणाऱ्या लोकांवर कोठें आडून तर कोठें प्रत्यक्ष तोबे हाणले आहेत.

वामनपंडितांनीं तर आपल्या प्रतिपक्ष्यांवर कहरच उडवून दिलेला आहे. मुक्तेश्वर आपल्या वेळच्या भोंदू भक्तांवर, अभक्तांवर व मर्मज्ञानहीन श्रोत्यांवर घसरले आहेत. यांतून तात्पर्य असें काढावयाचें नाहीं, की लट्ठालट्ठी, लाथडालाथड व धांगडधिंगा करणें म्हणजे उत्तम व सज्जनसंमत अशी गोष्ट आहे. यावरून इतकेंच समजावयाचें कीं, मतभेदाचा प्रश्न आला म्हणजे टीकाप्रतिटीका, आघातप्रत्याघात, हे होण्याचा संभव असतोच. परंतु असा आघातप्रत्याघात घडून आला, म्हणजे त्याच्या गलबल्यानें कवित्व बुजावून भुरकन उडून जातें, हें म्हणणें मात्र वायफळ आहे.

१०. या निबंधाचा साक्षरवर्ग विचार करून, सारासारविवेक करील, अशी उमेद बाळगून आहों.

बाळकृष्ण अनंत भिडे.

C
—
74